# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. २९/०१/२००९

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरूवार दिनांक २९/०१/२००९ रोजी सभा सुचना क्र. १९ दि. २२/०१/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ४) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ५) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ६) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| ७) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| ८) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| ९) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | -- | सदस्या |
| १०) | श्रीम. हेलन गोविंद | -- | सदस्य |
| ११) | श्री. याकुब कुरेशी | -- | सदस्य |
| १२) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| १३) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| १४) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| १५) | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह | -- | सदस्य |
| १६) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |

**गैरहजर सदस्य — निरंक**

**<u>उपस्थित अधिकारी</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. शिवाजी बारकुंड | -- | शहर अभियंता, सार्व बांधकाम |
| २) | श्री. उत्तरेश्वर लोंढे | -- | सहा. संचालक नगररचना |
| ३) | श्री. दिपक खांबित | -- | कार्यकारी अभियंता, सार्व. बाधकाम विभाग |
| ४) | श्री. शरद बेलवटे | -- | उप मुख्य लेखाधिकारी |
| ५) | श्री. नरेंद्र चव्हाण | -- | जनसंपर्क अधिकारी |
| ६) | श्री. गोविंद परब | -- | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन |
| ७) | श्री. गणेश पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ४ |
| ८) | श्री. क्लासो फर्नांडीस | -- | मुख्य अग्निशमन अधिकारी |
| ९) | श्री. मनोहर म्हात्रे | -- | विभाग प्रमुख, जाहिरात |
| १०) | श्री. संजय तायशेटे | -- | विभाग प्रमुख, परवाना |
| ११) | श्री. स्वप्नील सावंत | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ३ |
| १२) | श्री. नरेंद्र पाटील | -- | विभाग प्रमुख, भांडार |
| १३) | श्रीम. चारुशीला खरपडे | -- | अधिक्षक, सामान्य प्रशासन |
| १४) | श्री. संदिप शिंदे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| १५) | श्री. राजकुमार कांबळे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| १६) | डॉ. लहाने | -- | आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग |
| १७) | श्री. दादासाहेब खेत्रे | -- | विभाग प्रमुख, जकात |
| १८) | श्री. एन के. सोनार | -- | प्रशासन अधिकारी, शिक्षण |
| १९) | श्रीम. सिमा मिश्रा | -- | सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग |
| २०) | श्री. नागेश इरकर | -- | विभाग प्रमुख, वन विभाग |
| २१) | श्री. किरण राठोड | -- | विभाग प्रमुख, अतिक्रमण विभाग |

**गैरहजर अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. ओमप्रकाश दिवटे | -- | उपायुक्त अतिक्रमण |
| २) | श्री. संभाजी पानपट्टे | -- | उपायुक्त, आरोग्य विभाग |
| ३) | श्री. अजित पाटील | -- | कर निर्धारक व संकलक |
| ४) | श्री. दादासाहेब आ. पाटील | -- | मुख्य लेखापरिक्षक |
| ५) | श्री. विजय पाटील | -- | सहा. आयुक्त, परिवहन विभाग |
| ६) | श्री. संजय गोखले | -- | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन |
| ७) | श्री. भारत जगताप | -- | सहा. नगररचनाकार |
| ८) | श्री. सुनिल यादव | -- | चौकशी अधिकारी |
| ९) | श्री हेमंत पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ |
| १०) | श्री. बाबुराव वाघ | -- | विभाग प्रमुख, वाहन |
| ११) | श्री. रामचंद्र असोदेकर | -- | विभाग प्रमुख, सुवर्ण जयंती |
| १२) | सौ. सई वडके | -- | विधी अधिकारी |
| १३) | श्री. संजय दोंदे | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. २ |
| १४) | श्री. राज घरत | -- | सिस्टीम ॲनालीस्ट, नागरी सुविधा केंद्र |

**मा. सभापती :-**

सचिवांनी सभेला सुरूवात करावी.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

तिन्ही बजेटचे मी एकत्रच वाचतो.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, तुम्ही मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००८-०९ चे सुधारित व २००९-१० चे मुळ अंदाजपत्रक सादर करणे. आपण वर लिहिले आहे की, परिवहन आणि विशेष समित्यांचे ठराव निरंक तसेच खाली दुसरा विषय आहे, मुळ अंदाजपत्रक सादर करणे ही तिन अंदाजपत्रके, ११४,११५,११६ यांचे त्या त्या समित्यांमध्ये ठराव पास झाले. मग ते ठराव परिवहन व विशेष समित्यांचे ठराव, अमुक अमुक आणि मग खाली ते विषय आले पाहिजेत.

**नगरसचिव :-**

हे ११४ आणि ११५,११६ हे एकच बजेट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे ना. मग तुम्ही वर निरंक लिहिले आहे ते ही बरोबर आहे.

**नगरसचिव :-**

ते ह्या मुळ बजेटमध्येच आले. प्रकरण क्र. ११४, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००८-०९ चे सुधारीत व सन २००९-१० चे मुळ अंदाजपत्रक मा. सभापतींना सादर करीत आहेत.

(मा. आयुक्त सो. यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००८-०९ चे सुधारीत व सन २००९-१० चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समिती सभापतींना व सन्मा. सदस्यांना सादर केले.)

**मिलन म्हात्रे :-**

वर त्या विषयात निरंक लिहिले आहे. ते ही बरोबर आहे. म्हणजे ठराव झालेलेच नाही.

**नगरसचिव :-**

ठराव झाले आहेत. पण बजेटचा विषय बजेटमध्येच आला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी काय म्हणतो त्याचा घुमवून फिरवून विचार न करता व्यवस्थित सरळ उत्तर द्या. मला सांगा परिवहन व विशेष समित्यांचे ठराव खालीलप्रमाणे असे पाहिजे तुम्ही निरंक कुठल्या अर्थाने लिहिले? मग निरंक लिहिले तर खाली चर्चा होउ शकत नाही.

**नगरसचिव :-**

मुळ बजेटमध्येच ते आलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

परत परत तेच तेच काय सांगता? मी वाचरतो त्याचे मला स्पष्ट भाषेमध्ये उत्तर द्या. परिवहन, विशेष समित्यांचे ठराव, आयुक्तांकडील पत्र व कामकाज. ती खालची लाईन सोडून द्या. पण मग तुम्ही ठराव निरंक कसे लिहिता, खालीलप्रमाणे लिहिले पाहिजे. तरच पुढची चर्चा चालू होईल. वरच तुम्ही निरंक लिहिले तर खालची चर्चा बेसलेस आहे. तुमचीच विषयपत्रिका आहे.

**नगरसचिव :-**

ठिक आहे. दुरूस्ती करून घेतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब, तुम्ही घडी घडी तुमच्या डिसीजन चेंज करू नका. मागे तुम्ही असे सांगितले होते की, ज्या समितीने मा. स्थायी समितीपुढे ठराव पाठवला असेल तर तो ठराव इकडे येईल. आत्ता परत तुम्ही असे सांगता.....

**नगरसचिव :-**

बजेटच्या ठरावात आले होते. तो बजेटचा ठराव आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही मागे असे बोलले होते की, जो विषय मा. स्थायी समितीकडे येतो. तोच ठराव इथे येतो. आणि आत्ता यांनी सांगितले तर तुम्ही बोलता की, दुरूस्ती करतो. तुम्ही तुमच्या डिसीजन वर रहा ना.

**नगरसचिव :-**

बजेटमध्ये आलेले आहे. मा. आयुक्त २००८-०९ चे सुधारित व २००९-१० चे मुळ अंदाजपत्रक तसेच प्रकरण ११६, वृक्षप्राधिकरण २००८-०९ चे सुधारित व २००९-१० चे मुळ अंदाजपत्रक मा. सभापतींना सादर करित आहेत. मा. आयुक्त साहेब, बजेटवर निवेदन करत आहेत.

(मा. आयुक्त यांनी वृक्षप्राधिकरण २००८-०९ चे सुधारित व २००९-१० चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समिती सभापतींना व सन्मा. सदस्यांना सादर केले.)

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने निवेदन करतो. सन्मा. स्थायी समिती सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स साहेब व सर्व स्थायी समिती सदस्य, तसेच उपस्थित अधिकारी व कर्मचारी वर्ग मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेचे "अ" व "क" चे सन २००८-०९ चे सुधारित व सन २००९-१० चे मुळ अंदाजपत्रक सादर करताना मला अतिशय आंनद होत आहे. मिरा भाईंदर शहराची दिवसेंदिवस झपाट्याने वाढ होत असून या वाढत्या लोकसंख्येला नागरि सेवा सुविधा पुरविणे क्रमप्राप्त आहे. याशिवाय औद्योगिकरण व शहर सौंदर्यीकरण याचा देखिल विचार होणे अत्यंत गरजेचे आहे. शहरासाठी नागरी सेवा सुविधा योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्रशासनाने व राज्यशासनाने शहर विकास आराखड्यातील महत्वाच्या योजना लक्षात घेउन JNNURM अंतर्गत योजना मंजुर केल्या आहेत. त्याचा ह्या अंदाजपत्रकात समावेश करण्यात आला आहे. या अंदाजपत्रकात वृक्षप्राधिकरण बजेट व "P" बजेटचा देखील समावेश करण्यात आलेला आहे. JNNURM मधील पुढील योजना (१) भुयारी गटारे योजना, (२) एकात्मिक नाला प्रकल्प, (३) इन्टिग्रेटेड सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट या योजना प्राधान्याने मंजुर करण्यात आल्या आहेत. पैकी भुयारी गटार योजनाकामी केंद्र / राज्य शासनाकडून ४१४२ लक्ष रूपये अनुदान मनपास प्राप्त झालेला आहे. तितकाच निधी मनपाला स्वतःचा हिस्सा म्हणून उभारावा लागणार आहे. यासाठी एम.एम.आर.डी.ए. कडून २६००.०० लक्ष रूपये कर्ज मंजुर झालेले असून या वित्तीय वर्षात आणखी ६२००.०० लक्ष रूपये कर्ज मंजुरीचा प्रयत्न राहिल. तरीदेखील उर्वरित रक्कम मनपा हिस्सा म्हणून लावणे आवश्यक आहे. यास्तव खर्चात काटकसर करून निधी JNNURM कडे वळविण्यात आलेला आहे. त्यामुळे मंजुर योजना वेळेत पुर्ण होतील.

अर्थसंकल्पातील ठळक बाबी अशा आहेत. मालमत्ता करापासुन आपल्याला जवळ जवळ ४७.५० कोटी रूपये उत्पन्न मिळाल्याचे अपेक्षा आहे. जकात कर ८५.३३ कोटी, पाण्यावरील कर ३०.८२ कोटी विशेष शिक्षण कर १.७० कोटी, विकास कर ५.०० कोटी तसेच बाजार फी २.२० कोटी, नवीन नळ जोडणी ३.५५ कोटी, अग्निशमन सेवा कर १.७० कोटी, वृक्षकर १.७० कोटी व राज्य शासनाने आपल्याला यावर्षी ७३ कोटी अनुदान द्यावे अशी अपेक्षा आहे एम.एम.आर.डी.ए. कडून ६२ कोटी कर्ज मिळेल. मनपाचा हिस्सा जवळपास ११.९२ कोटी आहे. असा १४७ कोटीचा हिशेब देण्यात आलेला आहे. खर्चाच्या बाबतीत भुयारी गटार योजनेसाठी १२५ कोटी खर्च होईल अशी अपेक्षा आहे. एकत्मिक नाला विकास प्रकल्पासाठी १० कोटी आणि इंटीग्रेटेड सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट साठी २.८५ कोटी खर्चाच्या विकासात्मक कामाच्या ठळक बाबी अशा आहेत. आपण दरवर्षीप्रमाणे ह्यावर्षी देखील जवळपास ७ कोटी रूपये नविन रस्ते आणि नवीन गटारे बांधण्यासाठी ठेवलेले आहेत. रूग्णालय दवाखाने यासाठी १.४५ कोटी आहेत. घनकचरा व्यवस्थापनासाठी १.१४ कोटी आहेत. भाईंदर (प) टेंबा हॉस्पीटलसाठी जवळपास ४ कोटींची प्रोव्हीजन करण्यात आलेली आहे. संगणकासाठी लॅन, वॅन लाईन्स आपल्याला करायच्या असल्यामुळे २ कोटी ठेवलेले आहेत. नवीन फायर फायटर खरेदीसाठी आपण मागच्यावर्षी

प्रमाणे ६.१० कोटी ठेवलेले आहेत. वृक्षप्राधिकरणासाठी ३.२१ कोटी आहेत. वरिवहन सेवा अनुदानासाठी, परिवहनच्या बजेटसाठी २.२५ कोटी द्यावे लागणार आहेत. पाणी पुरवठा व मलनिःसारण अनुदान आपण जवळपास ६.४६ कोटी ठेवलेले आहेत. महिला बालकल्याणसाठी ३८ लक्ष आहेत. जे.एन.एन.यु.आर.एम. मधील मनपाचा हिस्सा ११.९२ कोटी आहे. डी.पी. रोडसाठी आपण १४ कोटींची प्रोव्हीजन ठेवलेली आहे. नंतर जेसल पार्कच्या भुयारी मार्गासाठी आपण ५.०० कोटी ठेवलेले आहेत. आरक्षित जागा विकसित करण्यासाठी ३.०० कोटी ठेवलेले आहेत. यावेळेस आपण जेनरल बजेट नावाचा वेगळा प्रकार करत आहोत. जे.एन.एन.यु.आर.एम. मध्ये केंद्र शासनाने काही पी बजेट आणि जेण्डर बजेट करायला सांगितले असल्यामुळे त्याची रिक्वायरमेंट असल्यामुळे आपण जनरल बजेटसाठी वेगळा बजेट ठेवलेला आहे.

मिरा भाईंदर शहरातील महिलांच्या/मुलींच्या शैक्षणिक आरोग्य विषयक सर्वकंष विकास होण्याच्या दृष्टीने या अर्थसंक्ल्पात उत्पन्नातुन अत्यावश्यक खर्च वजा जाता उर्वरित ५ टक्के इतकी रक्कम रू. ३८ लक्ष इतकी जेण्डर बजेटसाठी तरतुद करण्यात आलेली आहे.

या तरतुदीमधून महिलांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवून महिलांच्या आर्थिकदृष्ट्या सक्षमिकरणास चालना देण्यास मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्राधान्य असणार आहे.

"पी" बजेट :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्या मागासवर्गीय प्रभाग यांना मुलभूत सेवा सुविधा प्राप्त होण्यासाठी यामध्ये रस्ते, दिवाबत्ती, साफसफाई, अग्निशमन सेवा, पाणीपुरवठा, रूग्णालये, शिक्षण, उद्याने, गलिच्छ वस्ती निर्मुलन, महिला बालकल्याण योजना राबविण्यासाठी मूळ अंदाजपत्रकातील तरतुदी लक्षात घेवून २५ऽ इतका खर्च "पी" बजेटमध्ये अपेक्षित धरण्यात आलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आत्ता आपला ऑक्ट्रॉय परत लागला. तो कोणी घ्यायचा ते नंतरचा वाद. पण गेल्या तीन दिवसापासुन मी संपूर्ण इंडस्ट्रीयल एरियामध्ये पायी फिरत आहे. तर ज्या इंडस्ट्रीमुळे आपल्याला डेलीचा ऑक्ट्रॉय रोकडे स्वरूपात मिळतो, मग ठेकेदाराने वसुल करू द्या किंवा आपण, माझी अशी सुचना होती की, आपण जे बजेट पास करतो आणि ऑक्ट्रॉयची अमाउंट फिक्स करतो. त्याच्यातील ५ टक्के ते १० टक्के अमाउंट स्पेशल इंडस्ट्री एरियाचे रस्ते वगैरे सुधारण्याकरिता आपण का ठेवू नये? पाणी व्यवस्था आहे, लाईट व्यवस्था आहे, रस्ते आहेत. अक्षरशः तुम्ही माझ्याबरोबर पायी चला. म्हणजे गटारे फुटून त्याच्यात बटबटलेली एवढी घाण, कचरा, आणि सगळे तुटलेले रस्ते आहेत. तुम्ही कुठच्या बळावर आपण ऑक्ट्रॉय वसुल करतो? आत्ता तुम्ही करता, उद्या तो ठेकेदार मारून झोडून करणार. त्याच्या बदलामध्ये आपण इंडस्ट्री एरियांना काय देतो? त्याकरिता माझी अशी सुचना आहे की, या बजेटमध्ये सेपरेट हेड तयार करून त्याच्यावर इंडस्ट्रीकरिता ऑक्ट्रॉयच्या ५ टक्के खर्च तिकडे व्हायला पाहिजे. सुरूवातीला दोन वर्षे होईल. कारण ते इन्फ्रास्ट्रक्चर आपलेच आहे. एकही रस्ता सरळ नाही. तुम्ही पायी फिरायचे आणि तुम्ही मग ते एम.एम.आर.डी.ए. कडून करायचे की काय करायचे ते तुम्ही बघा.

**मा. आयुक्त :-**

सुचना चांगली आहे. समितीने त्याचा विचार करावा.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये स्पेशल नोट तयार करावे लागेल. आपले जे लेखापाल आहेत त्यांना तुम्ही आजच आदेश द्या.

**मा. आयुक्त :-**

महानगरपालिका हद्दीत होणारा महसुली/भांडवली खर्च "अ" अंदाजपत्रकातुनच होत आहे. त्याचे प्रमाण सुत्र लक्षात घेवून "पी" बजेट तयार करण्यात आले आहे.

शहर नियोजन हे शहराच्या विकासाला गती देणारे असणारे आवश्यक आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे शहराच्या विकासाच्या वाट्यात सर्वांना संधी मिळणे हे अत्यंत महत्वाचे आहे हिच बाब केंद्रभुत मानून जे.एन.एन.यु.आर.एम. मधील योजनाची अंमलबजावणीसाठी या अर्थसंकल्पात नागरिकांवर कुठलीही करवाढ न करता नियोजन करण्यात आलेले आहे. या अर्थसंकल्पातील योजना तडीस नेताना सर्व घटकांचे सहकार्य लाभेल अशी आशा व्यक्त करून हा अर्थसंकल्प आराखडा मा. स्थायी समितीस सादर करीत आहे. जय हिंद! जय महाराष्ट्र!

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, आपल्या परवानगीने बोलतो. मा. आयुक्त साहेब, एम.एम.आर.डी.ए. चा रेट ऑफ इंटरेस्ट किती आहे.

**मा. आयुक्त :-**

८ टक्के.

**अनिल सावंत :-**

मग आपण एम.एम.आर.डी.ए. कडूनच लोन का घेतो? म्हणजे गर्व्हनमेंटचे तसे काही नॉर्म्स आहेत की, इतर संस्थांकडून आपल्याला लोन घेउ शकत नाही?

**मा. आयुक्त :-**

इतर महानगरपालिकांना देखिल यापुर्वी एम.एम.आर.डी.ए. ने जे.एन.एन.यु.आर.एम. मधून लोन दिले आहे.

**अनिल सावंत :-**

जे.एन.एन.यु.आर.एम. वेगळी स्कीम आहे. त्याच्यामध्ये तुम्हाला ५० टक्के सबसिडी दिली जाते.

**मा. आयुक्त :-**

आपण एम.एम.आर.डी.ए. कडून दोन गोष्टींसाठी लोन घेत आहोत. जे.एन.एन.यु.आर.एम. साठी वेगळे आणि रेग्युलर डी.पी. रोडसाठी वेगळे. डी.पी. रोडसाठी यापुर्वीच २४ कोटी रूपये मान्य झालेले आहेत. त्यापैकी १२ कोटी रूपये आपण मागच्या वर्षात उचललेले आहेत. त्याप्रमाणे आपल्या आढ रस्त्यांचे काम जवळपास ६० टक्के ते ७० टक्के पर्यंत पुर्ण होत आलेले आहे. आणि पुढच्या फायनानशीअल वर्षात आपल्याला उर्वरित १२ कोटी अपेक्षित आहेत. त्यांची ऑलरेडी मंजुरी......

**अनिल सावंत :-**

माझा मुद्दा हाच आहे की, एम.एम.आर.डी.ए. व्यतिरिक्त आपण इतर संस्थांकडून लोन घेउन शकतो की नाही?

**मा. आयुक्त :-**

घेउ शकतो.

**अनिल सावंत :-**

कारण संपुर्ण जगामध्ये आर्थिक मंदी आहे त्यामुळे रेट ऑफ इंटरेस्ट बरेच डाउन झालले आहेत. त्यामुळे त्या दृष्टीकोनातुन महापालिका का प्रयत्न करत नाही.

**मा. आयुक्त :-**

हे जे २४ कोटी लोन मंजुर झालेले आहे ते माझ्या माहितीप्रमाणे २००७ पुर्वीच झालेले आहे. त्यावेळेस तेजी होती. त्यावेळेस सर्वात लोअर रेट एम.एम.आर.डी.ए. चे होते. बाकी सगळीकडे १० टक्के ते १२ टक्केच्या वर रेट ऑफ इंटरेस्ट होता. त्यामुळे त्यावेळेस महापालिकेने एम.एम.आर.डी.ए. कडून जे लोन घेतले ते योग्यच आहे. यापुढे मंदीचा अंदाज बघुन जर एम.एम.आर.डी.ए. पेक्षा एखादी बँक ७ टक्के, ६.५ टक्के देत असेल तर नक्कीच आपण त्यांच्याकडे जाउ. तसा आपल्या फायद्याचा विचार करता येईल.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, सहा तारखेच्या स्टँडींग मिटींगमध्ये मॅक्सेस मॉल समोरचे जे ग्राउंड आहे. त्याच्याबद्दल तुम्ही सांगितले होते की, जो रिपोर्ट आहे तो पंधरा दिवसात तयार होईल आणि त्याच्यावर जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर कार्यवाही केली जाईल. तर तो रिपोर्ट तयार आहे का? कारण पंधरा दिवस होउन गेले आज जवळ जवळ सव्वीस दिवस झाले. माझा मॅक्सस मॉलला ऑब्जेक्शन नाही त्याच्यासमोरच्या म्युनिसिपल ग्राउंडचे आहे.

**मा. आयुक्त :-**

मॅक्सस मॉलच्या समोरील ग्राउंडच्या बाबतीत मी सन्मा. सभागृहाला सांगू इच्छितो की, ह्याबाबत चर्चा झाली होती. त्याप्रमाणे आपण जे संबंधित प्रभाग अधिकारी आहेत त्यांना नोटीस दिलेली आहे. आणि त्याचबरोबर संबंधित जे, ज्यांना आपण ग्राउन्ड बी.ओ.टी. वर दिले होते त्यांनापण नोटीस दिलेली आहे आणि त्याच्यावर पुढील आठ दिवसात आम्ही अंतिम निर्णय घेउ.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आता जे बोलतात की, बी.ओ.टी. वर दिलेले आहे हे कुठल्या आधारे बोलतात? तुम्ही बोलतात त्याला आधार काय?

**मा. आयुक्त :-**

यापुर्वी मा. महासभेने जो काही धोरणात्मक निर्णय घेतला की, आपल्या शहरातील काही रिझर्व्हेशन्स, गार्डन्स, शिवार गार्डन असेल किंवा प्ले ग्राउन्डस असतील. त्याबाबतीत मा. महासभेने एक समिती स्थापन केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

शिवार गार्डन बोलू नका. ठराव नंतर पास झाला आहे. अगोदर त्या कमिटीला आम्ही हजर होतो. म्हणून तिकडे वाट लागली नाही. शिवार गार्डनचा धोरणात्मक निर्णय अगोदर झाला. तुम्ही नवीन आहात. जरा सगळी कागदे वाचा. मा. आयुक्त साहेब, आपण वक्तव्य करता, फार मापून तोलून बोला. बी.ओ.टी. वर दिलेला आहे तो ठराव स्टँडींगला रद्द झाला आहे. तुम्ही त्या बिल्डरला मुद्दाम प्रोटेक्ट करण्याकरिता अजुनपर्यंत काही नाही हे बोला. ज्या ठरावानुसार तुम्ही त्याला बी.ओ.टी. वर दिले तो ठराव रद्द झाला. त्याची इम्प्लीमेंटेशन कोणीच करत नाही. श्री. आर. डी. शिंदे पासून सर्व पाट्या टाकत बसले आहेत. जो आयुक्त येईल तो तेच धंदे करतो. श्री. सुदामराव गायकवाड यांचा तिकडे फ्लॅट आहे. श्री. आर.डी.शिंदे यांनी काय काय उद्योग केले आहेत ते तुम्हाला सांगतो. भाईंदरला सगळे सहन करत राहायचे का? त्या बिल्डरने अगोदर तुमचे मार्केटचे रिझर्व्हेशन खाल्ले आहे. जे मॉल आणि टॉवर उभे राहिले आहेत तिकडे गार्डनची आणखीन किती बलात्कार करणार? आणि हे सगळे आम्ही बघत राहायचे का? त्या श्री. आर.डी. शिंदेंनी महापालिकेचे त्र्यंबक अण्ण दामले उद्यान अर्धे तोडायला घेतले होते. ज्या त्र्यंबक दामलेंनी झाडे लावली, लहान मुलांसारखी वाढवली. त्या सावलीमध्ये आम्ही लाहनाचे मोठे झालो. ती झाडे त्यांनी तोडायला घेतली. मा. आयुक्तांनी हे दलालीचे धंदे करायचे नाहीत. हे केले आहे. म्हणून तुम्हाला बोलतो. माझ्याकडे याचा पुरावा आहे. आज तुम्ही जे बी.ओ.टी. वर दिले होते तो रद्द केलेला आहे. आत्ता त्याचा तिथे काही अर्थ नाही. तुम्ही आत्ता जे वक्तव्य केले ते तुम्ही मागे घ्या. तो ठराव फर्म केला आहे. ठराव रद्द झाला आहे. आम्ही स्टँडींगचा ठराव रद्द केला आहे. स्टेट गर्व्हनमेंटने रद्द केला आहे. उपविधी वाचा. कुठल्याही सदनाचा ठराव मंजुर झाल्यानंतर मा. आयुक्तांनी काय करायचे ते रेकॉर्डला आणा. तुम्ही असे कसे बोललात की, बी.ओ.टी. वर दिले आहे? ते रद्द झालेले आहे. त्याच्यावर तुम्ही कार्यवाही केली नाही ते बोला. श्री. सुदामराव गायकवाड असो, तुम्ही असो, तुमची सगळ्यांची इनव्हॉल्व्हमेंट आहे. सार्वजनिक रस्ते त्यांनी बंद केले आहेत. मी तुमच्याकडे वीस दिवस झाले येतो आहे. त्यादिवशी मा. महासभेत मी नव्हतो म्हणून ते गेट तोडून आणायची तुमची हिंम्मत होत नाही, ते बोला.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे. इथे कोणाची हिंम्मत आहे. कोणाची नाही हा विषय नाही.

**मिलन म्हात्रे :-**

हा विषय आहे. तुम्हाला ते क्लीअर करावे लागेल. तुमच्याकडे लेखी तक्रार देउनसुद्धा तुमचा प्रभाग अधिकारी जाउन नोटीस मारतो आणि तुम्ही सांगता की, त्यांना नोटीस द्यावी लागेल. उद्या मी तुमचा खालचा गेट बंद करतो. मला नोटीस द्या. केस कोण करणार? त्याने तुमचा रस्ता अडवलेला आहे. उद्या दहा रस्ते आम्ही अडवतो. माझ्या प्रॉपर्टी मधून तुमचे मेन रोड गेले आहेत. मी गेट टाकतो. मला नोटीस द्या तिथपर्यंत रस्ता बंद राहील. सातबारा उतारा तुमच्या नावावर, तुमच्याकडे परमिशन न मागता त्याने बेकायदेशिर एक पोलिस चौकी बांधली. त्यांनी परमिशनही मागितली नाही. जरा त्याचे ॲप्लीकेशन वाचा. श्री. आर.डी. शिंदे यांनी कशाच्या आधारावर परमिशन दिली? त्या बांधकाम विभागाने कुठल्या आधारावर परमिशन दिली? तो परमिशन मागत नाही. तो सरळ धडधडीत उद्धटपणे बोलतो की, मी माझा खर्च करतो. तो खर्च करायला तयार आहे आणि तुमच्याकडचा नगरसेवक निधी जातो. हे काय चालले आहे? तुम्ही काय म्हणता? तुम्ही सांगणार ती पुर्व दिशा का? तुमच्या पलिकडेपण भरपूर आहे. तुम्हाला त्रास द्यायची आम्हाला इच्छा नाही. पण तुमची सुद्धा एखाद्याला वाचवण्याची परिसिमा आहे. तिथपर्यंत थांबा. त्याच्यापुढे जाल तर मग खड्डयामध्ये पडाल आणि वाचवायला इकडचे कोणी नसणार आणि इकडचे बिल्डर तर कोणीच नाही. स्पष्ट भाषेत तुम्हाला सांगतो. पोलिस चौकीचे प्रकरण एक महिना प्रलंबित आहे. का लागतो? तुम्हाला मी तुमच्याच डी.सी. रूल दाखवला. त्या माणसाने परमिशन न मागता श्री. आर.डी. शिंदे यांनी उदार होउन त्याला परमिशन दिली. पोलिस स्टेशन, इन्सपेक्टर साहेब तो अमुक ठिकाणी बांधा. तुम्ही परमिशन तिस-याच ठिकाणी देता. ती परमिशन देताना पोलिस स्टेशनच्या लेटरचा हवाला देता. तो इन्स्पेक्टर भाईंदर वेस्टच्या ब्रीजखाली तुम्ही बेटामध्ये देता. श्री. घेवारे हुशार, स्वतःच्या गाळ्यातील घोंगडे काढून श्री. बारकुंड यांच्या खांद्यावर बांधायला तो मोकळा. बाकीच्या बिल्डर लोकांचे लोच्याचे प्लान त्यांनी आणि तुम्ही सह्या करून पास करायचे.

**मा. सभापती :-**

श्री. म्हात्रे साहेब, आपले विषय कुठले आहेत त्याच्यावर बोला.

**मिलन म्हात्रे :-**

हाच विषय आहे. तुम्ही पंधरा दिवसात काय केले ते बोला. नाहीतर आम्ही ही मिटींग चालू देणार नाही.

**मा. सभापती :-**

सांगितले ना.

**मिलन म्हात्रे :-**

काय सांगितले? त्या प्रभाग अधिका-याने काय केले? एक कागद चिकटवून आहे. पुढे कार्यवाही काय?

**मा. सभापती :-**

उत्तर दिले ना.

**मिलन म्हात्रे :-**

कसले उत्तर दिले.

**मा. सभापती :-**

कार्यवाही केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कसली कार्यवाही केली.

**मा. सभापती :-**

आठ दिवसात तुम्हाला उत्तर देतो.

**मिलन म्हात्रे :-**

कसले उत्तर देणार आहात? आम्हाला उत्तर नको कार्यवाही पाहिजे.

**मा. सभापती :-**

नोटीस बजावली आहे म्हणून.....

**मिलन म्हात्रे :-**

कुठली बजावली?

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब, याचेपण उत्तर देउ द्या. हा विषय शहराचा आहे. फक्त मा. स्थायी समितीमध्ये अवलोकन आणि.....

**मिलन म्हात्रे :-**

अवलोकनाचे पण मा. स्थायी समितीला काही लिमिटेशन आहेत.

**जुबेर इनामदार :-**

आपल्याकडे इकडी काही काम आहे की, नाही?

**मिलन म्हात्रे :-**

श्री. आर.डी. शिंदे यांनी एका वर्षामध्ये चार पाच करोड रुपयांचे अवलोकन केले.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही सभापती असतेवेळी स्टॅन्डीगमध्ये तो ठराव झालेला आहे. बी.ओ.टी. कॅन्सल झालेला आहे. त्या ठरावाचे पुढे काय झाले? त्या ठरावाला काही अर्थ नाही का? प्रशासनाने तो कच-याच्या टोपलीमध्ये टाकला आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही वाचून दाखवा की, ठराव पास झाल्यावर मा. आयुक्तांनी काय करायचे होते? ते जरा वाचा. ते रेकॉर्डवर येउ द्या.

**अनिल सावंत :-**

मा. स्थायी समितीमध्ये एवढ्या जबाबदार पदाधिका-यांसमोर ठराव पास होतो आणि त्या ठरावावर काही कार्यवाही होत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मिटींग बंद करा. मिटींग कशाला घेता?

**अनिल सावंत :-**

म्हणजे हा मा. सभापतींचा आणि सन्मा. सदस्यांचा अपमान आहे. नाहीतर त्यांनी निर्देशद्यावेत की, हा ठराव चुकीचा आहे आम्ही विखंडीत करायला पाठवला आहे. अशी काहीतरी कार्यवाही व्हायला पाहिजे की नाही?

**मिलन म्हात्रे :-**

हिम्मत असेल तर तुम्ही विखंडीत करुन दाखवा.

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये जी काही वस्तुस्थिती आहे ती सांगतो. जी माझी माहिती आहे त्याप्रमाणे मा. महासभेने जी एक कमिटी स्थापन करुन आपल्याकडची आरक्षणे विकसित करण्यासाठी खाजगी संस्थांना देण्याचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयाच्या अनुषंगाने त्या समितीने मॅक्सस मॉल समोरील ग्राउंड संस्थेला दिलेला आहे. याचा अर्थ ज्या मा. महासभेच्या ठरावाच्या अनुषंगाने कार्यवाही झालेली आहे. त्या ठरावाच्या अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीचा पूर्नविचार करायचा असेल किंवा ती कार्यवाही रद्द करायची असेल किंवा त्याच्यामध्ये काही फेरबदल करायचा असेल किंवा त्या प्रकरणात युटर्न घेउन ते रद्द करायचा असेल तर ही सर्व कारवाई मा. महासभेच्या निदर्शनास आणून करावी अशी अपेक्षा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, कमिटीने जो निर्णय घेतला. त्याच्यात धोरणात्मक निर्णय असा शब्द आहे. तुमचे सेक्शन काय सांगतात माहिती आहे का? याचा अधिकार तुम्हाला पण नाही. तुम्ही जे काय कराल, कमिटीने नक्की करुन ते मा. महासभेपुढे परत पाठवले पाहिजे. तुम्ही ते केले का? नुसती महासभा-महासभा करत राहू नका. तो ठरावसुध्दा विखंडीत करण्याकरीता मी तुम्हाला रिझनवाईस पत्र दिले आहे. त्याचे काय केले? मला उत्तर तरी दिले? मी केलेली तक्रार चुकीची आहे किंवा आपण दिले हे अयोग्य आहे म्हणून हा ठराव विखंडीत करता येत नाही. तुम्ही मला दोन ओळींचे उत्तर द्या, जी पत्र दिली ती तुम्ही रॅपरमध्ये घालून बंगल्यावर, इकडे-तिकडे ठेवायची आणि आम्ही फेऱ्या मारत रहायचे. हे काय चालले आहे? साहेब, आम्हाला लेखी उत्तर द्या. मी तुम्हाला जे पत्र दिलेले आहे. सदर पत्र योग्य असेल तर कारवाई करा. नसेल तर अयोग्य आहे म्हणून मला तुमचे कारणानुसार उत्तर पाहिजे. तुम्ही ठराव-ठराव करु नका. तो ठराव बेकायदेशीर आहे. तो ठराव का बेकायदेशीर आहे ते ही तुम्हाला मी सांगतो. त्यांनी निर्णय घेउन तो मा. महासभेपूढे पाठवायचा आहे. तो न पाठवता त्यांनी स्टॅन्डीगला ठराव घेतला. तो ठराव आम्ही इकडे रद्द केला. त्याच्याबद्दल बोला. श्री. घेवारे जे तुणतुणं वाजवत होते ते बंद करा. लोकांना मिसगाईड करु नका. श्री. घेवारेंनी पत्रकारांनासुध्दा असेच मिसगाईड केले आणि त्याचे परिणाम आत्ता ते एक-दिड महिन्यामध्ये भोगतील.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, ही सुचना घ्या.......

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

त्याचे वाईट परिणाम काय आहेत ते एकून घ्या. आज मा. महासभेने, त्या कमिटीने जे प्ले ग्राउंड एक महिना त्याला कमर्शियल युजला दिले. कुठल्या कायद्यानुसार ते ठरवले तर उद्या हे सभागृहसुध्दा बिअर बारमध्ये देतील. इथे आपण पोरी नाचवू या. आपण ते करु. आपण खाली चांगला फर्स्ट क्लास कार्यक्रम ठेवू. त्या चार लोकांनी जो काही निकाल घेतला आहे. त्या ठरावातसुध्दा खाडाखोड केली आहे. त्याच्यात पहिला गटनेता लिहीले आहे. त्यानुसार आमची नावे ठेवली गेली. नंतर कट केली आहेत. नगरसचिवांना पत्र लिहीले आहे. तो ओरीजनल ठराव निट आणा. त्याच्यात खाडाखोड झाली आहे. आणि कुठल्याही ठरावामध्ये ज्यावेळेला खाडाखोड होते. त्यावेळेला क्रॉस चेक किंवा बेअरर चेकसारखी कुठेतरी इनिशिअल केली पाहिजे. तिकडे इनिशिअल केली आहे का? हे काय धंदे चालले आहेत. पहिल्यांदा त्याच्यात आयुक्त पण लिहले नव्हते, नंतर हाताने आयुक्त लिहीले आहे. त्याच्यामध्ये ह्यांनी जे काय केले आहे, त्याच्यामध्ये ही महापालिकेची असेट्स आहेत. कुठल्या एका मिलन म्हात्रेला अधिकार नाही की, तिकडे डायसवर बसून काही लिहून द्यायचे. आपल्या मा. महापौरांनी एक पत्रही दिले आहे की, आमच्या इकडे ए.डी.टी.पी. नको. ते पत्र आहे का? कोर्टाने परवा कोर्टात घेउन यायला सांगितले आहे. मा. महापौरांना कोणी अधिकार दिला? तुमची जी काही पोस्ट आहे, त्याच्यात ऑफीसर बनु नका म्हणून बोलायचे. रायटींगमध्ये दिले आहे. ते आत्ता कोर्टाच्या पटलावर येत आहे. आम्ही काय-काय करायचे? चोऱ्यामाऱ्या भरपुर लोकांनी करायच्या आणि आम्ही झाडू घेउन साफ करण्याचा ठेका घेतला आहे काय? तो ठराव ज्यावेळेला रद्द झाला. गेल्या वर्षभरापासून तुम्हाला अनेक पत्रव्यवहार केलेला आहे. एकाही पत्राचे साधक बाधक उत्तर नाही. त्या

ठिकाणी रोडवर महापालिकेच्या बत्या आहेत की नाहीत. बिल आपण भरायचे आणि गेट मनुभाईने लावायचा. तो महापालिकेचा जावई आहे काय? तुम्ही उद्या सिव्हील ड्रेसमध्ये जा, दुसरी गाडी घेउन माझ्याबरोबर चला. आपल्याला त्याचे सिक्युरीटी गार्ड गाडी पार्क करुन देत नाही. सात-बारा तुमच्या नावावर आहे. तो मनुभाई तिकडे पोलीस चौकी बांधायला तुमची परमिशन घेत नाही. त्या पोलीस चौकीला गृह खात्याची परमिशन नाही. तुमचा जी.आर. बोलतो, मी बोलत नाही. हाय पॉवर टेन्शनचा तुमचा स्वतःचा डी.सी. रुल बोलतो की त्याच्या खाली परमिशन द्यायची नाही. श्री. घेवारेंकडे जेव्हा महत्वाचा विषय आला तेव्हा त्यांनी तो श्री. बारकुंडकडे ढकलला. ह्यांना त्यावेळेला फक्त प्लान पास करुन २० टक्के खाण्यासाठीच बसवले होत काय? त्यांच्याकडे प्रत्येक पत्र आल्यावर त्यांनी बिईंग अ ए.डी.टी.पी. म्हणून निर्णय घ्यायला पाहिजे की, डी.सी. रुलमध्ये अमुक अमुक आहे. त्यांचे रायटींगचे पत्र माझ्याकडे आहे. त्यांनी श्री. बारकुंड साहेबांकडे वर्ग करताना कुठल्या कारणास्तव केले ते सगळे माझ्याकडे आहे. त्यांनी सांगितले पाहिजे की, डी.सी. रुलमध्ये ही अशी प्रोव्हीजन आहे. वरुन हायपावर टेन्शनची गेलेली आहे. तिकडे कुठलेही बांधकाम करायला आमची परवानगी नसणार, हे स्पष्ट सांगितले पाहिजे. एखाद्या नगरसेवकाने, मी जरी रेकमेन्ड केले की, माझा नगरसेवक निधी त्या ठिकाणी वापरा. तर तो त्या ठिकाणी वापरता येणार नाही हे त्यांनी स्पष्ट केले पाहिजे. ते केलेले नाही. हे लक्षात घ्या. आता तिकडे त्या कमिटीने वर्षाचा एक महिना म्हणजे १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर हा कालावधी आपण पकडू या. त्याच्यानंतर १ जानेवारी नंतर त्याला कमर्शिअल युज करायला परमिशन कोणी दिली? तिकडे आजही तिकीटे फाडतात. तुमच्या सार्वजनिक रस्त्यामध्ये त्याने अंडरआर्म क्रिकेट ठेवले आहे. त्या दिवशी मी मुद्दाम तिकीट काढली. माझ्याकडे सगळी तिकीटे आहेत. दोन मिनिटामध्ये तो माणूस चाळीस रुपये तिकीट फाडतो आणि माणसांना एन्ट्री देतो. तुमचा सार्वजनिक रस्ता तो वापरतो. आज त्याने समोर पंडाल बांधले आहे. एवढी भिक लागली का? तुमचा जो ओपन स्पेसचा जो रोड आहे, एक्सेस ऑफ रोड ज्यांनी जाहिर केला आहे की, तो सार्वजनिक आहे. गेल्या एक वर्षापासून नेट प्रॅक्टीस चालू आहे. तुम्हाला कोणाला ते दिसत नाही का? आम्ही तुम्हाला किती भांडायचे? रस्ता तुमच्या मालकीचा आहे. उद्या मी समोर तुमच्या गेटवर लावतो. सगळे दिसते, सगळे करतात. पण तुम्ही करु शकत नाहीत. आणि ते करा नाहीतर भराल. तुम्हाला स्पष्ट सांगतो. हे सगळे कागदोपत्री आहे. आजही फोटो काढून ठेवले आहेत. पंधरा दिवसात तुमच्याकडे कोर्टाच्यावतीने ते फोटो येतील. तुम्हाला जवाब द्यायचा आहे. तुम्ही ज्या रस्त्याची बिले भरता. तो रस्ता अडवून त्याच्यावर कमर्शिअल युजसाठी स्वतःचे पंडाल लावून सगळे विकण्याचा अधिकार त्याला कमिटीने दिला का? प्ले ग्राउंड सोडून आत्ता तुमच्या सार्वजनिक रोडमध्येपण दुकाने चालु आहेत. आता तिकडे फक्त तिकीटे लावून बायका नाचवायच्या बाकी आहेत. बाकीचे सगळे पूर्ण झाले आहे. त्यादिवशी जो अख्खा मेळावा लागला, १२-१२ वाजेपर्यंत लोकांना झोप नाही. कुठल्या कायद्यामध्ये आहे की, दहा वाजल्यानंतर माईक ठेवायचा? बाकीचे लोक बोलत नाहीत. स्थानिक नगरसेवक आवाज उठवत नाहीत. उचलणार कसे? त्यांचे बॅनर बरोबर लागतात ना. तुम्ही त्यांची कारवाई करा. आज पंडालचे झाले. आपले संपूर्ण फुटपाथ अडवलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, मला बोलायचे आहे.

**मा. सभापती :-**

बोला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, विषय असा आहे की, साहेबांनी जे सांगितले की, तिकडे आपल्या महानगरपालिकेच्या लाईट लागलेल्या आहेत. तिकडे आपल्याला पार्कींग करु देत नाही आणि ती पोलिस चौकी बांधलेली आहे. तर याच्यामध्ये थोडेसे चुकीचे आहे. कारण तिथे ऑलरेडी पार्कींग करायला देतात. मी स्वतः माझी गाडी घेउन गेलो होतो. तिथे पार्कींग झालेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण आम्हाला देत नाहीत. मी माझे बोलतो. मी कुठे बोलतो तुमची देत नाहीत. मी माझे बोलतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दुसरी गोष्ट, ती जी पोलीस चौकी आहे ती मनुभाईने बांधलेली नाही. ती आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेने बांधलेली आहे आणि एका सन्मा. सदस्याच्या नगरसेवक निधी आहे. त्याच्यामध्ये त्याचा संबंधच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

माहिती काढा. श्री. आर. डी. शिंदे यांनी मनुभाईला परमिशन दिली आहे. नगरसेवकाला दिलेली नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मनुभाईला परमिशन दिलेली आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

परमिशन दिलेली आहे म्हणून काय झाले? पण नगरसेवक निधी वापरला आहे ना?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला मी कागद देतो. ते सगळे कागद वाचा आणि मग वक्तव्य करा. त्यांनी कुठलाही पैसा नगरपालिकेकडून मागितलेला नाही. त्या कागदामध्ये त्याने सरळ सांगितले आहे की, मी माझ्या खर्चामध्ये ही चौकी बांधत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तिथे क्लिअरकट बोर्ड लागलेला आहे की, ही पोलीस चौकी मिरा भाईंदर महानगरपालिकेने श्री. संजय नारायण पांगे यांच्या नगरसेवक निधीतून बांधलेली आहे. असा बोर्ड लागलेला आहे. तर प्रशासनाने खुलासा करावा.

**मिलन म्हात्रे :-**

अधिका-यांनी खुलासा करावा. आम्ही कशाला बोलतो? आम्हाला बोलायची हौस कुठे आहे?

**ग्रिटा फॅरो :-**

तुम्ही असे कसे बोलता की, वेश्या इथे आणून नाचवायचे, हे शब्द तुम्हाला शोभतात का?

**मिलन म्हात्रे :-**

मी वेश्या हा शब्द वापरलेला नाही.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, पुढच्या मा. स्थायी समितीसमोर तुम्ही जो रिपार्ट देणार आहात. त्यावेळी.....

**मिलन म्हात्रे :-**

कशासाठी? टाईम बॉन्ड संपलेला आहे.

**अनिल सावंत :-**

त्यावेळी हा जो मा. स्थायी समितीचा ठराव झालेला आहे. त्याचासुध्दा विचार करुन, उल्लेख करुन त्या ठरावा बाबतीत काय ॲक्शन घेणार आहात ती ॲक्शन घ्यावी. आणि प्रभाग अधिका-यांना फक्त नोटीस काढली. पुढे कारवाई काय? अजुनही त्याचे होर्डीग्ज चारही बाजुला लावलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला त्याचा एक रुपया मिळत नाही.

**अनिल सावंत :-**

महापालिकेला काहीच नाही. मा. सभापती इकडे ऑर्डर देतात की, मी पंधरा दिवसात रिपोर्ट देतो. तरीसुध्दा प्रशासन काहीच हालचाल करीत नाही. किती शरमेची गोष्ट आहे. मागच्या वेळेला एक्झीक्युटीव्ह ऑफीसर सरळ सांगतात की, त्यांनी महापालिकेची परवानगी घेतलेली आहे. प्रभाग अधिकारी सांगतात की, परवानगी घेतलेली नाही. एवढा मोठा गोंधळ.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव झालेला असताना परवानगी देणार कसे?

**जुबेर इनामदार :-**

प्रभाग अधिकारी बोलत होते की, मला त्याच्याबद्दल काही माहितीच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ज्या ठरावानुसार त्याला ते प्ले ग्राउंड मिळाले. त्याच स्टॅन्डीग कमिटीने तो ठराव रद्द केला. मग तुमचा प्रभाग अधिकारी देतो कसा? मा. आयुक्त परमिशन कशी देतात?

**अनिल सावंत :-**

आणि ही जी पोलीस चौकी बांधलेली आहे त्याचीसुध्दा चौकशी करा की, महानगरपालिकेचे पैसे लागलेले आहेत की, त्यांने स्वतः बांधलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

अधिकृत आहे की अनधिकृत आहे?

**अनिल सावंत :-**

स्वतः बांधलेली असेल तर महापालिकेने त्याला कोणत्या धर्तीवर परमिशन दिलेली आहे. याचा संपूर्ण उल्लेख तुमच्या कार्यवाहीमध्ये असु द्या.

**मिलन म्हात्रे :-**

आणि सगळ्या सदस्यांना ते फाईलचे पेपर द्या. म्हणजे त्यांना कळेल की, नेमके काय आहे? तुमच्याकडून त्याने एक रुपया मागितलेला नाही. मी माझ्या स्वखर्चाने ही बांधतो.

**अनिल सावंत :-**

नगरसेवक निधीचा उपयोग झाला आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बांधकाम विभागाचे काय म्हणणे आहे?

**मिलन म्हात्रे :-**

तो बोलतो मी बांधणार आहे. खर्च माझा आहे. तुम्ही नगरसेवक निधी कसा काय दिला?

**मा. सभापती :-**

परिवहनचा विषय घ्या. मा. सभापतींना जाउ द्या.

**मिलन म्हात्रे :-**

फायनल काय ठरवले?

**अनिल सावंत :-**

नगरसेवक निधी लागला की नाही?

**मा. सभापती :-**

मी खुलासा करतो.

**मिलन म्हात्रे :-**

पहिला खुलासा होउन जाउ द्या. काही फरक पडत नाही.

**मा. सभापती :-**

खुलासा केल्याशिवाय आपण मिटींग समाप्त करणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ते मागे बसले आहेत. दोन मिनिटात खुलासा होईल त्यांना सगळे माहित आहे.

**मा. सभापती :-**

त्यांना उशीर झाला आहे. त्यांना कशाला बसायला लावू.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना पैसे पाहिजेत. मॅक्सस मॉलवरुन परिहवनची सेवा चालू केली ती पण चार पॅसेंजर घेउन जाते. आणि चार पॅसेंजर घेउन येते. ती लॉसमध्ये चालली आहे हे त्यांना कळेल. बघतो आणि बोलतो. आम्ही धडधडीत उघड्या डोळ्यांनी बघतो. आमच्या इकडे बघायला या.

**ग्रिटा फॅरो :-**

नंतर प्रॉफीट होईल.

**मिलन म्हात्रे :-**

नंतर काय, वर्ष झाले लॉस होतोय.

**ग्रिटा फॅरो :-**

बिझनेस करताना लॉसच होतो.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आम्हाला सांगु नका. आम्ही वयाच्या सतरा वर्षापासून बिझनेस करतो.

**ग्रिटा फॅरो :-**

बिझनेसमध्ये कधी नफा कधी तोटा असतोच.

**मिलन म्हात्रे :-**

मग इकडे ती मागणी करायची नाही. कोणाला तिकडे जायची हिम्मत होत नाही.

**ग्रिटा फॅरो :-**

तुम्ही पण मा. आयुक्तांना हिम्मत हिम्मत......

**मिलन म्हात्रे :-**

सरळ आहे. मी त्यांना तोंडावर बोलतो. त्यांनी उत्तर द्यावे. चार वेळा हात जोडल्यानंतर असे शब्द येतात. तुमच्यासारखे केले, तुमचे पुढारी मारामारी करतील. बाहेर केल्या आहेत. आम्ही ते करत नाही. वर्ष वर्ष पत्रव्यवहार करुन उत्तर येत नसेल तेव्हा असे बोलावे लागते.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

यातील असंसदीय शब्द वगळून टाका.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, आता श्री. म्हात्रे साहेब या विषयाबद्दल बरेच काही बोलले. आणि बोलताना ते नेहमी एका वाक्याचा उल्लेख करत राहिले की, तुम्हाला दिलेल्या पत्रव्यवहाराचे आम्हाला उत्तर मिळत नाही. हा माझाही तुमच्यावर स्पष्ट आरोप आहे. आम्हीही पत्रव्यवहार करतो. आम्हालाही कुठल्याही पत्राचे उत्तर येत नाही. साहेब, आपण मला सांगा. मा. महासभेमध्येसुध्दा याच्याबद्दल चर्चा चाललेली आहे......

**अनिल सावंत :-**

खेदाने नमुद करावेसे वाटते की, मा. आयुक्त कार्यालयाकडून उत्तर येत नाही.

**मा. आयुक्त :-**

आयुक्त कार्यालय काही वेगळे नाही. आयुक्त कार्यालय इन्क्ल्युड ऑल एच.ओ.डी.

**अनिल सावंत :-**

पण येतच नाही.

**जुबेर इनामदार :-**

आम्ही तुम्हाला संबोधित केल्यानंतर आम्हाला तुमच्याकडून उत्तर आले पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही नगररचना विभागाकडचे आमचे पत्र तुम्हाला दिलेले असते. रेफर टू यु तुम्ही नगररचनाला पाठवता. नगररचनाकडून उत्तर येते की, सदर बांधकामाबाबत आमचे अभिलेख तपासले असता कुठलीही परवानगी दिल्याचे आढळून येत नाही. पण ते अतिक्रमण झाले आहे किंवा अनधिकृत आहे. हे ते अधिकारी सांगतात की, तुम्ही सांगाल तेव्हा ते लिहणार.

**अनिल सावंत :-**

तो रेकॉर्ड तुम्ही मागवून तुम्ही उत्तर दिले पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्या पत्राचे उत्तर तुमचे काय आले पाहिजे की, आमच्या हिशोबाने डॉक्युमेंट शोधले असता परवानगी दिलेली नाही म्हणून हे अनधिकृत आहे. विषय संपला.

**मा. आयुक्त :-**

ते अनधिकृतच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण लेखी देत नाहीत. लेखी पाहिजे सौ बखी एक लिखी

**मा. आयुक्त :-**

त्या पत्राचा अर्थच तसा आहे.....

**मिलन म्हात्रे :-**

साहेब अर्थ नाही, लेखी पाहिजे मी तुमच्याकडे स्ट्रक्चर अधिकृत आहे की अनाधिकृत याचा दाखला मागीतला आहे.

**मा. आयुक्त :-**

बांधकाम परमिशन नसेल तर ते अनाधिकृत राहिल.

**मिलन म्हात्रे :-**

मग त्यांनी ते लिहायचे ते अधिकारी आहेत. (सभागृहात गोधंळ)

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही असे बोला की, जे सगळे अनधिकृत आहे ते बरोबर आहे.

**मा. सभापती :-**

मी पोलीस चौकी म्हणतो. जेवढया पोलीस चौकी आहेत त्या अनधिकृत आहेत कारण ते आपल्याला सहाय्य करण्यासाठी त्यांना.....

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

पहिल्यांदा तुम्ही जे शब्द बोललात. ते तुमचे वाक्य मागे घ्या. तुम्ही सांगा की, पोलिस चौक्या बरोबर आहेत. मग मी शब्द मागे घेतो.

**मा. सभापती :-**

पोलीस चौक्या बरोबर आहे. अनधिकृत बरोबर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी माझे शब्द मागे घेतले मला हेच पाहिजे होते.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११५, परिवहन सभापती श्री. रेनॉल्ड बेचरी साहेब हे परिवहन उपक्रमाचे सन २००८-०९ चे सुधारीत व सन २००९-१० चे मुळ अंदाजपत्रक मा. सभापतींना सादर करीत आहेत. तसेच मा. परिवहन सभापती बजेटवर आपले निवेदन सादर करीत आहेत.

(मा. परिवहन सभापती रेनॉल्ड बेचरी यांनी परिवहन उपक्रमाचे सन २००८-०९ चे सुधारीत व सन २००९-१० चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समिती सभापतींना व सन्मा. सदस्यांना सादर केले.)

**रेनाल्ड बेचरी (मा. परिवहन समिती सभापती) :-**

मा. स्थायी समिती सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स व सन्मा. स्थायी समिती सदस्य, सदस्या....

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. श्री. खतगावकर साहेब आज कुठे आहेत ? तुमचे परिवहनचे बजेट होते. आज ते पाहिजेत इकडे टेक्नीकल कोणी नाही. उपायुक्त कुठे आहेत.

**मा. आयुक्त :-**

रजेवर आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

किती उपायुक्त रजेवर आहेत. मा. सभापती महोदय, याच्यामध्ये मा. परिवहन समितीचे सभापती म्हणून आपण आपल्या संपूर्ण मनोगत म्हणा किंवा आपले निवेदन म्हणा, हयामध्ये आपण एकतर अशी दिशाभूल केलेली आहे. मा. महासभेने तुम्हाला भाडेवाढ करायचा ठराव करून ऑलरेडी दिलेला आहे. मग आपण याच्यात कसे म्हणता की, कुठलीही भाडेवाढ सुचविण्यात आलेली नाही. म्हणजे तुम्ही मा. महासभेचा अवमान केलेला आहे. एकीकडे तुम्ही लॉस झाले म्हणून आमच्याकडे अनुदान मागता.

**रेनॉल्ड बेचरी :-**

येणाऱ्या वर्षामध्ये ते दिले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अर्थसंकल्प येणाराच असतो. येत्या वर्षात आपल्याल काय दिवे लावायचे ते याच्यात आपण लिहायचे असते.

**अनिल सावंत :-**

ती भाडेवाढ त्यामध्ये दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब परत एकदा सांगतो मग या सभागृहाचे वातावरण तापले ही पुस्तिका छापल्या अगोदर मा. महासभेने तुम्हाला भाडेवाढ करण्याचा पुर्णपणे अधिकार दिलेला आहे. तुमचे जे कोणी संबधित अधिकारी आहेत. त्यांनी मुद्दाम याच्यामध्ये रिप्लेक्ट केलेले नाही. आणि त्याचाच परिणाम म्हणून मा. सभापतींच्या भाषणामध्ये हे घालण्यात आलेले आहे. मला एक सांगा, मा. महासभेचा ठराव पहिला झाला. त्याचा इफेक्ट त्याच्यात आला पाहिजे की नाही ? मा. महासभेने अमुक अमुक ठरावानुसार अशी अशी भाडेवाढ प्रस्तावीत केलेली आहे. त्यानुसार पुढील वर्षाकरीता हया हया रुटला आम्ही एवढे एवढे पैसे वाढवित आहोत. अधिभार पाच टक्के वाढवित आहोत. हे पाहिजे ना ही पुस्तिका छापल्यानंतर जर मा. महासभेचा ठराव झाला तर आम्ही समजू शकतो. हा ठराव झाला असून सुध्दा तुम्ही हे केलेले आहे. म्हणजे तुमचे भाडेवाढ न करण्याचे रिफलेक्शन आहे. एकीकडे तुम्हाला फुकटचे अनुदान मिळते. अधिकाऱ्यांच्या बदमाशीमुळे तुम्ही हे करता ना लॉस होतो. लॉस काय काय होतो ती आम्ही उदाहरणे देतो. तक्रारी केलेल्या आहेत. त्याच्यावर कुठलाही इलाज होत नाही. मला सांगा, याच्यात तुम्ही सुधारून टाका की, आम्ही ठरावाची अशी अशी रिफलेक्शन याच्यात घेणार आणि ज्यावेळेला आम्ही बजेटला बसू त्यावेळेला कुठल्या रेटला तुम्ही किती पैसे वाढवणार आहात. तिकीटामागे अधिभार असतो. तो लावणार आहात का ? सगळी ती डिटेल आणा आणि ती तुम्ही दया. हयाच्यात परत दुसरे एक आहे. तुम्ही बोरिवलीचा उल्लेख करता तुम्ही वसईचे म्हणू शकता वसईला तुम्ही एक नाही दहा रुट वाढवा शंभर वाढवा आम्हाला त्याचे काही घेणे देणे नाही. पण परत एकदा सांगतो. ज्यावेळेला ही परिवहन सुरू झाली त्यावेळेला सुध्दा श्री. आर. डी. शिंदेच होते. तेव्हा त्यांनी आमच्या नगरसेवकांना सगळयांना खोटे सांगीतले की, येत्या ती महिन्यामध्ये, त्यांचे भाषण मा. महासभेला रेकॉर्ड झाले आहे. येत्या तीन महिन्यात मुंबई मध्ये आपली बससेवा सुरू होईल. ठाण्यात आपली बससेवा सुरू होईल. आणि वसई विरारमध्ये सुरू होईल. हे चार वर्षापूर्वी त्यांनी सांगीतलेले आहे. त्यापैकी तुम्हाला ठाण्याला परवानगी मिळालेली नाही. आणि मुंबईला मिळाली नाही. मेहेरबानी करा, फक्त वसई परवानगी देणार नाही. स्पष्ट आहे. तुम्ही ते वगळा आणि काय बोलायचे ते सांगा.

**याकुब कुरेशी :-**

मला माझी एक सुचना विचारायची आहे. आत्ता ज्या बस आपण ठेका पध्दतीने घेतलेल्या आहेत. त्याच्यामध्ये डिझेलचे भाव वाढतात तेव्हा आपण त्यांना दर वाढवून देतो का? किंवा कमी होतात तेव्हा दर

कमी करून देतो का ? आत्ता माझ्या माहितीप्रमाणे दोन वेळा डिझेलचे दर कमी झालेले आहेत. त्यामुळे भाडेवाढ करण्याची गरज मला वाटत नाही. ठराव केलेला आहे पण परत लोकांचा गैर समज होतो की, डिझेलचे भाव कमी होतात आणि दर कसे वाढतात.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. श्री. कुरेशी साहेब, आता ही निवडणूक होउुन जाउु दया. मे मध्ये निवडणूक आहे. जूनमध्ये नवीन बजेट मध्ये सगळे वाढणार आहे.

**याकुब कुरेशी :-**

ते वाढू दया, वाढेल तेव्हा वाढेल.

**मिलन म्हात्रे :-**

आपला ठराव आहे, मग तुम्ही अनुदान देउु नका. अनुदान बंद करा. तिकडे तुम्ही फुलस्टॉप करा. आणि जर अनुदान दयायचे आहे तर त्याला पर्याय म्हणून तुम्ही भाडेवाढ दिलेला आहे. मग लॉस कुठे होतो, फक्त डिझेल नाही. फेऱ्या न मारता पण पेमेन्ट होतो ना बंद गाडयांचे पण पगार निघतो. आपल्या परिवहनचा श्री. पाटील नावाचा अधिकारी कुत्र्याचा वाढदिवस करायला पंचवीस हजार खर्च करतो. आम्ही आमच्या मुलाबाळांवर कधी खर्च केला नाही. हा मोठा जोक आहे.

**अनिल सावंत :-**

मा. परिवहन समिती सभापती साहेब, या ५० बसेस आपल्याजवळ आल्या का?

**रेनॉल्ड बेचरी :-**

आलेल्या आहेत.

**अनिल सावंत :-**

४८ होत्या ना ?

**रेनॉल्ड बेचरी :-**

आता पूर्णपणे ५० बसेस आहेत.

**अनिल सांवतः-**

मध्यंतरी मा. महासभेमध्ये आपला MURTP च्या माध्यमतून, MURTP हा एक प्रोजेक्ट होता आणि त्याच्यामध्ये मा. महासभेमध्ये एक ठराव झालेला आहे. संपूर्ण सात महानगरपालिकांची कॉमन बससेवा असावी. ग्ग्डक़्त्रॄ मला वाटते येणाऱ्या वर्षामध्ये त्याचे इम्प्लीमेन्टेशन करणार आहे. त्याच्याविषयी तुमच्या अधिकाऱ्यांना काही माहिती आहे का ? किंवा तुम्हाला काही माहिती आहे का ? MMRDA चा जो कॉमन वाहतूक सेवा हा जो प्रोजेक्ट आहे. तो ऑलमोस्ट तयार आहे आणि त्याचे इम्प्लीमेन्टेशन येणाऱ्या वर्ष सहा महिन्यामध्ये होणार आहे. सात महानगरपालिकांमध्ये इंटरनल कॉमन बससेवा त्याबाबतीत तुमच्याकडे काही माहिती आहे का ?

**मा. आयुक्त :-**

नाही.

**अनिल सावंत :-**

आपण ठराव करून दिलेला आहे की, हया महानगरपालिकेची मान्यता आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव झालेला आहे.

**अनिल सावंत :-**

जनरल बॉडीचा ठराव झालेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सर्व माहिती आहे, पण कोण कार्यवाही करत नाही. तुम्ही चांगले चांगले ऑफीस, ए सी बसवून दिले तुमचे ऑफीस एवढे भारी नाही तेवढे त्यांचे आहे आम्हाला त्यातील आकस नाही. त्याचे परिणाम काम न होण्यामध्ये होते. गेल्या चार वर्षापासून आम्ही मागणी करतो की, BMC ला जसे छोटया - छोटया रुटला मिनी बसेस आहेत. हया मागणीचा तुम्ही कुठेही विचार केला नाही. उलट आमच्या मागणीनुसार तुमच्या आणखीन दोन चार ठेकेदारांची सोय लागेल. जर मंजूर केली तर त्या छोटया बसेस जर तुम्ही घेतल्या तर पेणकरपाडा घोडबंदर, काशिगांव, शांतीनगर, भाईदर खारीगांव, नवघर, गोडदेव, खारी इंटरलिंकचे जे रोड आहेत. नवीन जे अरुंद रस्ते आहेत. हया ठिकाणी ती मिनी बससेवा सुरू केली तर तुम्हाला प्रॉफीट होतो. त्या बसच्या किंमतीत एक मोठी बस येईल तर त्या त्याच्यामध्ये दोन येतील.

**रेनॉल्ड बेचरी :-**

सुचना फार चांगली आहे. आम्ही याच्यावर नक्की विचार करू

**मिलन म्हात्रे :-**

गेल्या चार वर्षापासून चालले आहे.

**अनिल सांवत :-**

मला वाटले या बजेटमध्ये तरी होईल.

**मिलन म्हात्रे :-**

श्री. उस्मान नुरले होते ते बोलले माझे नाव उस्मान नुरले आता काय बाकी उरले एवढे ते बोलले.

**अनिल सांवत :-**

आता तुम्ही कसे करणार हे बजेट तर तयार झाले.

**रेनॉल्ड बेचरी :-**

सुचना आता आलेली आहे.

**अनिल सांवत :-**

याच्यापूर्वी सुध्दा सुचना केलेल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

लेखी सुचना आहे. साहेब मी कधी हवेत बोलणार नाही. आमची लेखी सुचना आहे. ज्यावेळेला परिवहन सेवा सुरू झाली त्यावेळेला मा. आयुक्तांनी.....

**रेनॉल्ट बेचरी :-**

साहेब, मी तुमची लेखी सुचना काढतो आणि....

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, जर ऐकूर घ्या. आम्ही तुमचा रीस्पेफट करतो आम्ही चिडतो कधी, जेव्हा मा. आयुक्तांनी अशी प्रस्तावना केली. त्यावेळेला आम्ही सुचना दिल्या आहेत की, तुम्हाला जर हे प्रॉफीटमध्ये आणायचे असेल, तर हे हे करा आणि अजून त्या आल्या नाहीत तुम्ही पत्र काढा.

**अनिल सांवत :-**

मिनी बस ठेकेदारांना लॉस असेल ना ?

**मिलन म्हात्रे :-**

रिक्षाला परवडते मग ठेकेदारांना का परवडणार नाही.

**अनिल सावंत :-**

मिनी बस केल्या तर पूर्ण शांतीनगर कव्हर होईल जो आज काहीच फायदा होत नाही.

**रेनॉल्ड बेचरी :-**

मा. सभापती मा. आयुक्त साहेब आणि सर्व सन्मा. सदस्य सन्मा. सदस्य....

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब तुम्ही याच्यामध्ये शिलकीचे आहे की, कितीचे आहे ते लिहीलेच नाही. तुमचे हे प्रस्तावित झाले त्याच्यात तुम्ही क्लीअर केले पाहिजे. याच्यात शेवटच्या लाईनमध्ये सदरचा अर्थसंकल्प दोनशे रुपये प्रॉफीटचा किंवा शिलकी अर्थसंकल्प आहे किंवा तो....

**रेनॉल्ट बेचरी :-**

शिल्लकीचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण तो लिहा ना. तुमचे प्रस्तावित आहे ना तुम्ही नवीन आहात अधिकारी काय करतात? ते लेखापाल काय करतात? त्यांनी चेक केले ना? त्यांचे कामनाही की, याच्यात तुम्हाला एवढा एवढा लॉस आहे आमचा हा एवढयाचा तुटीचा अर्थसंकल्प आहे नसेल तर तो ॲज इट इज अर्थसंकल्प आहे. गंगाजळी एवढे एवढे बाकी आहेत आणि एवढे एवढे कर्ज आहे. हे याच्यात आले पाहिजे टायपिंग मिस्टेक आहे का?

**रेनॉल्ड बेचरी :-**

जाताना एकदम पॉझीटीव्ह विचार होईल या विश्वासाने तुम्हाला धन्यवाद देउुन रजा घेतो. थँक यु.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११७, पुर्नविनियोजन मंजूरी मिळणेबाबत (आरोग्य साफसफाई विभाग)

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, वृक्षप्राधिकरण बजेटवर मा. सभापतीचे निवेदन नाही का?

**मा. आयुक्त :-**

ते याच्यामध्ये इन्क्लूड आहे.

**अनिल सावंत :-**

बजेट आहे पण वृक्षप्राधिकरणमध्ये येणाऱ्या वर्षात काय करणार आहात ?

**मा. आयुक्त :-**

ते माझ्या निवेदनात आलेले आहे.

**जूबेर इनामदार :-**

वृक्षप्राधिकरणचे अंदाजपत्रक आलेले आहे मी या वृक्षप्राधिकरण समितीमध्ये असताना श्री. मिलन म्हात्रे साहेब आमच्या बरोबर होते महापालिकेचे जेवढे कर्मचारी किंवा आपण बाहेरून कॉन्ट्रक्टरचे जे कर्मचारी घेतो. त्यांना आपण गणवेश देउु दोघांना वेगवेगळे गणवेश देउु त्याने लक्षात येईल की, महापालिकेचे कर्मचारी कुठले आहेत आणि कंत्राटदाराचे कुठले आहेत. त्या ठरावाला पारित करून आज कमीत कमी वर्ष होउु गेले त्या

ठरावावर आजपर्यंत अंमलबजावणी का झाली नाही ? ठेकेदारांच्या लोकांना वाचवण्याचा प्रयत्न इथे केला जातो का ?

**तुळसीदास म्हात्रे :-**

त्यांच्यामध्ये किती कामगार काम करतात ते लक्षात येते

**जुबेर इनामदार :-**

महापालिकेचे कर्मचारी ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांच्या जागेवर काम करतात आम्ही इथे सुचना केली होती की, त्यांचे थम इम्प्रेशन घ्या किती हजेरी होते ते त्याच्यामध्ये लक्षात येईल.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यामध्ये आता माहिती घेतली असता असे दिसते की, आपण ड्रेसेस तयार केलेले आहेत. ते वाटण्याची सुरुवात पण झालेली आहे आपण म्हणता तसे दोन वेगवेगळे कलर न करता त्याच्यावर महानगरपालिका कर्मचारी आणि ठेका कर्मचारी असे ॲम्ब्रॉयडरी करून लिहून घेतलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, एक वर्ष उलटून गेले आहे ज्या अधिकाऱ्यांनी हे काम केले नाही किंवा त्याची अंमलबजावणी केली नाही. आज वर्ष गेले आम्ही ठराव कशाला मांडला होता की, कुठेतरी त्याची ओळख पटली पाहिजे. कंत्राटदारांनी बदमाशी नाही केली पाहिजे महापालिकेचे नुकसान नाही झाले पाहिजे आता याला कारणीभूत कोण? अधिकारी वर्ग आहे ना? त्यांच्यावर काय कार्यवाही करणार ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

ठराव झाल्यापासून त्यांची जी प्रक्रिया फॉलोअप केलेली आहे त्याची मी स्वतः तपासणी करतो त्यामध्ये जर कोणी जाणून बूजून उशीर केला असेल त्या संबधितांना आपण जबाबदार धरून त्यांच्यावर कार्यवाही करू.

**जुबेर इमादार :-**

साहेब, थोडक्यात म्हणजे वर्ष उलटून गेल ते जाणून बूजून आले की काय ते तुमच्या लक्षात यायला पाहिजे

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, आरोग्यचा विषय चालला आहे. मी तुम्हाला एक पत्र दिले होते, जाफरी खाडी साफ करण्याबाबत कारण फार दुर्गंधी आहे आणि तिथे फार मोठा प्रॉब्लेम आहे तर त्याबाबतीत काय कार्यवाही केली ? कारण ते पावसाच्यापूर्वी होणे फार गरजेचे आहे त्यामुळे मच्छरचापण भयंकर त्रास होत आहे.

**मा. आयुक्त :-**

पावसाळयापूर्वी आपण करू.

**मिलन म्हात्रे :-**

११७ चे काय झाले ?

**अजित पाटील :-**

सन्मा. श्री. अनिल सावंत यांनी जाफरी खाडी साफ करण्याबाबत जे पत्र दिलेले आहे. तर जाफरी खाडीचे पात्र मोठया प्रमाणामध्ये आहे. आणि शांतीनगर, शांतीपार्क एरियातील सगळी गटारे तिथे जातात. बहूतेक गटारे जाउुन ती बुजत आलेली आहे. पावसाळयापूर्वी ते करण्याकरीता आता व्यवस्थीत करण्याच्या दृष्टीने अहवाल मागवलेला आहे. आणि ते मंजूर ..

**अनिल सावंत :-**

लवकरात लवकर करा. परत आचारसंहिता लागेल.

**अजित पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांकडे प्रस्ताव पाठवल्यानंतर मंजूरी दिल्यानंतर ते काम चालू करू.

**अनिल सावंत :-**

एकदम पुढेपर्यंत घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्या वॉर्डमध्ये त्या खाडीमध्ये अतिक्रमणे झाली आहेत. अनेक लेखी तक्रारी झाल्या. अतिक्रमण विभागाला वेळ मिळत नाही. त्याचे फोटोग्राप्स मी काढुन आणले आहेत. आज तुम्हाला माझे आणखीन एक पत्र येईल. ते बघ. करु शकलात तर काहीतरी लिहुन द्या. ते बोलले होते की, अतिक्रमण योग्य आहेत. ११७ चे काय झाले.

**ग्रिटा फेरो :-**

आपण एखदे पत्र दिले तर त्याच्यावर किती दिवसांनी कार्यवाही केली जाते. मी इथे आणलेले नाही. कारवाई करणरा मिटिंगमध्ये येणर, आमची सभ अजुन झली नाही. अशी सर्व मला त्याची उत्तरे आलेली होीत. मी जुनमध्ये पत्र दिलेले होते. शाळा आहे. शाळेच्या बाजुला जुनी इमामरत आहे. त्याच्या आसपास जुने पिंपळाचे झाड आहे. इमारत मोडकळीला आलेली आहे. मी ते झड तोडण्यासाठी सांगितलेले होते.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यामध्ये प्रोसेस फॉलो करणे हा सोपस्कर आहे.

**ग्रिटा फेरो :-**

पण आज किती महिने झाले?

**मा. आयुक्त :-**

तुमची समितीने जर मान्यता दिलेली असेल तर तोडायला काही हरकत नाही. त्याच्यामध्ये आपण स्थळ पाहणी करु या.

**ग्रिटा फेरो :-**

का केली नाही? आज किती महिने झले. करायला पाहिजे होती. मी फोन केल्यावर मला काय उत्तरे आलेली आहेत. ते विचारा.

**मा. आयुक्त :-**

मॅडम त्याच्यामध्ये मी स्वतः ते बघुन घेतो. आवश्यकतेनुसार ते झाड............

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

ज्या व्यक्तिला अधिक्षक म्हणुन नेमले होते. त्या व्यक्तिला श्री. आर.डी. शिंदे यांनी मेहेरबानी करुन सरळ अधिकारी केले.

**मिलन म्हात्रे :-**

त्याची बदली करा असे मी तुम्हाला महिन्यापासुन सांगतो. मी तुम्हाला नाव सांगितले. श्री. अजित पाटील यांना त्याजागी ठेवा हे ही सांगितले. काहीतरी काम होईल. तुम्ही निर्णय का घेत नाही?

**मा. आयुक्त :-**

आपण त्याच्यामध्ये तुर्त पहिली स्टेप म्हणुन आधी शहराचे दोन भाग करुन दोघांना वेगवेगळे काम वाटुन दिलेले आहे. नंबर दोन एक्सला बदलायचे, वायला बदलायचे त्याचा विचार आपण करु. पण वृक्षांच्य बाबतीत मी सांगु इच्छितो की, माझ स्वतःचा आणि आपले सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांचाही झाडे कापण्याला  विरोध असतो. म्हणुन आम्ही प्रत्येक ठिकाणी थोडे काळजीपुर्वक जागा बघुन स्वतः जर गरज असेल तरच झाडे कापण्याची परमिशन देतो. त्यामुळे झाडे कापण्याच्या परमिशनमध्ये परत जाणुनबुजुन दिले नाही होण्याचे कारण मी तुत्म्हाला सरळ केले की, आम्ही जाणुनबुंजुन दिले नाही करतो कारण आम्हाला झाडे कापायला नको वाटते. पण तरी जर एखदे आवश्यक असेल तर आपण कापु या.

**ग्रिटा फेरो :-**

साहेब, आम्हालापण माहिती आहे की, झाडे कुठे कापायची कुठे नाहीत. खरोखर जिथे जिवीतहानी होण्याची शक्यता असते. बाजुला शाळा आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, तो ऑफीस सोडुन जात नाही. त्या व्यक्तीला तुम्ही...........

**शानु गोहिल :-**

आप बोलते हो की, आप जाकर देखेंगे। अब हर डिपार्टमेंट के लोग आपके अंडर अधिकारी है। फिर आपको जाना पडता है तो अधिकारी क्या काम करेंगे?

**ग्रिटा फेरो :-**

त्यांना विचारा याच्यावर का झाले नाही?

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

मा. महासभेमध्येसुद्धा या विषयावर वारंवार चर्चा होउनसुद्धा आपण त्याच्यावर कार्यवाही का करत नाही? निलंबनाची कार्यवाही, ठराव तयार करा आणि आजच्या आज करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

फक्त ३२ आणि स्मशानभुमी मिळुन ४३ आहेत. या ४३ मध्ये दिवसाला आपण एक जरी केले. तरी महिन्यामध्ये संपुर्ण गार्डनची व्हिजीट होते. साहेब, याची व्हिजीटच नाही. कुठे खेळली तुटली आहेत. कुठे झाड मेले आहे. काहीच यांना माहिती नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही जे उत्तर दिले ते व्यवस्थित ठोकळेबाज आणि साचेबाज आहे की एक तिकडे नेमला आहे आणि एक इकडे नेमला आहे. त्यांना काय कार्यवाही करायला सांगितलेली आहे ते तुम्ही बोललेले नाहीत. झाड पाडायला तुम्हाला गेट लागते. आता त्या जैन मंदिराच्या पाठिमागे पोलिस चौकी त्या झाडाच्या पुढे आहे. तो पोलिस चौकीचा अडथळा आहे. तिथे ट्राफीक जाम होतो म्हणुन झाड कापण्यासाठी आदेश दिले जातात. एवढे मोठे ते जैन मंदिराच्या मागचे झाड. साहेब, ही झाडे त्या अण्ण दामलेंनी वाढवली. ह्या क्रॉस गार्डनमधले चांगले झाड कापले गेले. त्याच्याखाली त्या बसडेपोचे लोक, प्रवासी उभे राहायचे. चांगले सुंदर झाड, कुजलेले, सडलेले वगैरे असे नाही. त्याचे आर्युमान कोणी ठरवले. चांगले झउ कापायचा आदेश कोणी दिला? तक्रार कोणी केली? हे जरा बघ. आणि हे दोन्ही अधिकारी साहेब, आज माझ्या गार्डनमध्ये लाल माती पडली आहे. तुम्ही त्याला चाळणी मारायला सांगा. पाउण ट्रक खडे निघले नाही तर मी माझ राजीनामा द्यायला

तयार आहे. शेणखत, किडे पडलेले ओले शेणखत आणले आहे. साहेब, पावसाळा सुरु व्हायला आता सहा महिने व्हायला आले. झाडाला ओले शेणखत टाकतात की सुके शेणखत? आम्ही शेतकरी आहोत. जाउन बघा. दोन ट्रक ओले शेणखत येउन पडले आहे. म्हणजे हे जॉब जे आहेत, त्या मॅडम बोलल्या, त्या अधिका-यांना ते पात्र नाहीत. सरळ घरी बसवा. आम्हाला कशाला वाद घालायला लावता. खेळणी तुटली आहेत. वर्ष वर्ष झाली खेळणी नाहीत. लहान मुले पडतात, हातापायांना लागते, कोणाचे लक्ष नाही. साहेब, आम्ही आमच्या गाठचे हे बघ माझे हात मी आता काम करुन आलो आहे. माझ्याकडे फाउन्टनचे काम मी स्वतः हात काळे करुन केले. त्या ठैकेदाराला काही कळत नाही. तो अंड्यात न पंड्यातला नवख. शेवटी सगळै काम मी करतो. वर्कशॅापमध्ये येउन बघा. तुमचा ना वृक्ष अधिकारी आलेला आहे. ना. डि.एा.सी. आलेले आहेत ना, त्यांचे ज्युनियर इंजिनिअर आले आहेत. ते श्री. पानपट्टे एकदा फक्त येउन गेले. झलक देउन गेले. पुढे काही नाही. त्यांना विचारा ते आले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

श्री. पानपट्टे साहेब, आपण कंत्राटवर कर्मचारी ठेवलेले आहेत. त्यांची हजेरी बघायला आजपर्यंत आपण गेलेले आहात का? तुमचा अधिकारी येत नाही. तुम्ही काय येणार? तुम्ही तर क्लास १ ऑफीसर आहात. तुमच्या खालचा कर्मचारी येत नाही. सकाळी सात वाजता सुभाषचंद्र बोस मैदानावर फिरायला जातो. तेव्हा झोपलेले असतात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.):-**

गेल्या आठ दिवसापासुन प्रत्येकाला सकाळी सात वाजता जाउन हजेरी घ्यायला सांगितले आहे.

**जुबेर इनामदार :-**

तो जातो का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.):-**

आपण दोघांना सांगितले आहे.

**जुबेर इनामदार :-**

आज्ञा का पालन क्यों नही करतें है?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.):-**

टायमिंग सकाळीच ठेवला आहे.

**जुबेर इनामदार :-**

श्री. गणेश पाटील आम्हाला भेटायचे. आजपर्यंज गेलो तर कोणी भेटतच नाही. आम्ही रोजच जातो. श्री. पानपट्टे साहेब, कोणाला सहकार्य करायचा प्रयत्न कशाला करता.

**मिलन म्हात्रे :-**

बारा-बारा वाजेपर्यंत अधिकारी नसतात.

**जुबेर इनामदार :-**

कर्मचारी दारु पिउन येतात. येतात आणि घरी जातात.

**ग्रिटा फेरो :-**

साहेब, त्या कामाचे काय? ते काम कधी करणार? मला उत्तर पाहिजे कारण खरोखर शाळा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पहिला सस्पेन्शन करा आणि मग काम करा. आम्ही ती मागणी करतो.

**जुबेर इनामदार :-**

आमची स्पष्ट मागणी आहे की, सस्पेन्शन का. आम्हाला अश पद्धतीचा अधिकारी पालिकेमध्ये नको.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, पेशवाई गेली नगारे आणि नगरपालिका गेली पगारे हे होणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब, मा. आयुक्त साहेबांना सांगु द्या. की या विषयाबद्दल ते काय कार्यवाही करणार आहेत? आपण पुर्नविनियोजनसुद्धं करु.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, त्या गार्डनला १४० ट्रक माती एका दिवसात पडली. ते ट्रान्सपोर्टर बसले आहेत. त्यांना विचारा की, १४० ट्रक एका दिवसात पडू शकतात का?

**तुळशीदास म्हात्रे :-**

गार्डनची माती मी स्वतः माझ्याकडे काशिमिराच्या एका गाडीवाल्याकडुन मागवली. तो दिवसाला दोन फे-या मारतो.

**मिलन म्हात्रे :-**

१४० ट्रक एका दिवसात? रॅायल्टी कुठे आहे? साहेब त्याच्यात तुमच्या सह्या लागतात. माझ्या प्लॅाटवरती टाकले मी रॅायल्टीवर सह्या दिल्या आहेत. तुमची सही नाही. सिक्युरिटी गार्डच्या सह्या आहेत. तुमची चौकशी चालु आहे. आठ-आठ महिने गेले. काल परवा हे साहेब सांगतात की, त्याला पेमेन्ट झाले.

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब, नंतरही सुद्ध चौकशी होते. शासनाने चौकशी केल्यावर पैसे भरावे लागतील.

**मिलन म्हात्रे :-**

नगरपालिकेनेच भरले. ४२ लाखाचे पेमेन्ट झाले. १४० तसे दहा दिवस जवळ जवळ १४०० गाड्या पडल्या. सुभाषचंद्र बोस मैदानाला बील पेमेन्ट केले.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी म्हटले त्याची चौकशी सुरु आहे.

**मिलन म्हात्रे :-**

किती करणार? पेमेन्ट झाले. पेमेन्ट का थांबवले नाही?

**मा. आयुक्त :-**

पेमेन्ट आधी झाला असेल. मला माहिती नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आता झाला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आठ दिवसापुर्वी

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुमच्या पायाखाली सगळा अंधार आहे.

**मा. आयुक्त :-**

पेमेन्ट आधी झालेला आहे. मी एक सांगु इच्छितो की, यापुढे जी काही कामे होतील. ती महानगरपालिकेचा फायदा लक्षात घेउन आपण काटकसरीचे धोरण अवलंबुन योग्य करत आहोत. तरी याउपर काही अधिकारी करत असमील . त्यांनी सस्पेन्शनला आणि पोलिस केसला तयारी ठेवावी आणि करावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्या कंपनीचे नाव काय?

**जुबेर इनामदार :-**

महासभेमध्येसुद्ध होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्हाला माहिती नाही. तुम्ही त्या विभागागचे इन्चार्ज आहात ना?

**नागेश इरकर :-**

साहेब बिल आलेले आहे. ते दोन वर्षापुर्वी झालेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

इन्क्वायरी तुमच्या अंडरमध्ये आहे.

**अनिल सावंत :-**

श्री. पानपट्टे यांच्या अंडर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

श्री. पानपट्टेनी त्यांनी त्यांच्याकडुन रिपोर्ट घेतला आहे. त्यांनी दिला नव्हता. मला आदेश नाही म्हणुन रिपोर्ट देत नाही असे उत्तर दिले. माझ्यासमोर दिले आहे. तुम्हाला फोन केला होता का नाही?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एवढे सगळे सुरु आहे की, त्यांनी हे केलेले आहे. तुम्हाला त्या कंपनीचे नावपण माहिती नाही?

**मिलन म्हात्रे :-**

४२ लाख म्हणजे यांना हलवापुरी वाटली काय?

**नागेश इरकर :-**

एक्रॉन आणि........

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला त्याची कागदपत्र पाहिजेत.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, हे तुलनात्मक विवरणपत्रामध्ये आरोग्य कर्मचारी गणवेश, गमबुट,छत्र्या खरेदी करणे यासाठी पाच लाखाचे प्रोव्हीजन होते. म्हणजे त्यांना गमबुट वगैरे देणार नाही का? तुम्ही अजुनपर्यंज काही खर्च केलेला नाही आणि ते पाच लाख डायवर्ट करता. दोन वर्षातुन एकदा देतो. यावर्ष् देणार नाही असे आहे का.

**अजित पाटील :-**

बहुतेक कर्मचारी कॉन्ट्रॅक्टरचे आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

मला एक  सांगा, त्या कर्मचाऱ्यांचे मरण असे होते लैप्टो आणि याच्यामध्ये आपले अधिकारी मरत नाहीत. एखदा डी.एम.सी. वगैरे मेला की, मग आपल्याला कळेल. माझी अशी इच्छा नाही.

**अनिल सावंत :-**

म्हणजे तुम्ही कॉन्ट्रॅक्टरकडुन ते गमबुट वगैरे देणार ?

**मिलन म्हात्रे :-**

जे डेथ होतात त्याला जिमेदार कॉन्ट्रॅक्टर राहतो का? ती माणसे आहेत ना. मग त्यांना तुम्ही सक्ती करात का?

**जुबेर इनामदार :-**

साहेब जे कंत्राटवर काम करणारे आहेत. ते अर्धी चड्डीसुद्धा घालत नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

असा कुठलाही कर्मचारी राहत नाही. गमबुट तर कुठल्याही कर्मचाऱ्याकडे नसतो. तुमचे परमनन्टपण घालत नाहीत.

**जुबेर इनामदार :-**

आपल्या अटी शर्तीमध्ये आहे की, त्यांना युनिफॉर्म दिला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, हे प्रकरण क्र. ११७ आहे. त्याच्यामध्ये वरच्या कोष्टकात ३ नंबर आहे. पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करणे. आता मला सांगा हे गेल्यावेळी जे तयार झाले ते आम्हाला मिळाले नाहीत. आणि आपल्या गार्डनमध्ये जो बोर्ड लावला आहे. तो २००३ चा आहे. अजुन बदललेला नाही. खालचा पर्यावरण अहवालाचा मोठा बोर्ड लावला आहे बघा.

**अजित पाटील :-**

तो जुना आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तो जुना म्हणजे काय? तुम्हाला ते सगळे १ जुनला द्यायला लागते. गेल्या १ जुनला तुम्ही अहवाल करुन कमीत कमी पाच-सहा जुनला तुम्हाला तिकडे प्रदर्शित करायचा आहे.

**संदिप शिंदे :-**

आपण सगळ्यांना वाटप केला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

वाटप केले आहे ते साडा. त्या बोर्डाचे काय ते बोला. २००३ नंतर कोणचे लक्ष गेले आहे काय? मा. आयुक्त साहेब, जरा तुम्ही स्वतः जाउन बघा. २००३ नंतर कोणीही त्याला रंगरंगोटी केलेली नाही. आणि अधिकारीसुद्धा जुनेच आहेत. २००३ ला जे गेले त्यांची नावे अजुन आहेत. काय प्रॉब्लेम आहे का?

**मा. आयुक्त :-**

त्याच्यामध्ये आपलेकडे जे होर्डिंगचे डिपार्टमेंट आहे. त्यापैकी आपण जे होर्डिंग हारास करतो. आपण काही होर्डिंग या कामासाठी ठेवलेले ओहत.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, विषयाला बगल देउ नका. तुमच्या हाताखालचे अधिकारी तुम्हाला मिस गाईड करतात. मी परत सांगता, तो होर्डिंग आपल्या महापालिकेच्या मालकीख आहे. खालच्या गार्डनमध्ये लावला आहे. त्याचे बोलायचे. उलटसुलट अख्या गाव दुनियेची स्टोरी आम्हाला सांगु नका. तिकडचा जो २००३ चा अजुन बदलला नाही. त्याला तुम्हाला काय अडचण आहे तेवऐ सांगा. आता आपण २००९ मध्ये आहोत.

**संदिप शिंदे :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो. साहेब, त्याच्यावर आपण डिस्प्ले करत नाही. आपण ज्या दहा साईट केलेल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

का करत नाही? मग तो बोर्ड काढुन टाका.

**संदिप शिंदे :-**

तिकडे डिस्प्ले करत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

डिस्प्ले झालेले आहे. मी बोलतो २००३ ला तिकडे डिस्प्ले झालेला आहे आणि तुम्ही तो निर्णय का घेतला? महापालिकेला डिस्प्ले कुठे आहे. बाहेर लोकांचे काय कळते? आज टीएमसी च्या एरियामध्ये इलेक्ट्रॉनि डिस्प्ले बोर्ड आहेत.

**संदिप शिंदे :-**

पोलिस स्टेशनच्या इथे आपण एक डिस्प्ले.......

**मिलन म्हात्रे :-**

कुठला? जाउन बघुन या. सगळे ठिकाणावर आहेत काय? मजाक आहे काय? तुमचया ॲक्टमध्ये ती प्रोव्हीजन आहे.तुम्हाला ते सगळे बंधन आहे.

**मा. आयुक्त :-**

इथला बोर्ड काढण्याची गरज नाही. याच्यावर तुम्ही ॲडीशनल करा.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही ते बोलतो. २००२ पासुन का केले नाही त्याचे आम्हाला उत्तर पाहिजे. साहेब, त्याची सर्व कॉस्टींग काढा. त्याला पन्नास हजार रुपये खर्च झाला असले.

**मा. आयुक्त :-**

इथे ॲडीशनल डिस्प्लेक रा.

**मा. सभापती :-**

पुर्नविनियोजन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

पोलिस स्टेशनला तुम्ही जे लावले आहे. त्याच्यावर सगळे पक्षी वगैरे संडास केले आहे. ते धुवायला तरी तुम्हाला वेळ आहे का? साहेब, मला याच्यावर रुलिंग पाहिजे. पर्यावरण सद्य स्थिती अहवाल तयार करणे, आत्ता याच्यावर मी तुम्हाला जे सांगितले त्याच्यावर आपले रुलिंग काय आहे?

**मा. आयुक्त :-**

महापालिकेतील कॅम्पसमधील बोर्डवर सुध्दा ह्या बाबतचे डिसप्ले करण्यांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

२००९ पर्यंत कारण ते २००२ चे आहे. साहेब तुम्ही जरा जाउन बघा.

**मा. आयुक्त :-**

चालू वर्षाचे डिसप्ले करण्यांत येईल.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, याच्यामध्ये जे तीन नंबर आहे, लेखाशिर्ष आरोग्य व सोयी जेसीबी ठेका वाहन चालक व एस.आय. घेणे.

**जुबेर इनामदार :-**

हे एस.आय. काय आहे ?

**अनिल सावंत :-**

सध्या आपल्याकडे एस.आय. किती आहेत ?

**अजित पाटील :-**

वाहन चालकाचा ठेका देण्यात येतो. तो बजेटमधील कॉलम घेतलेला.

**अनिल सावंत :-**

याच्यामध्ये तुम्ही वाहन चालक घेणार आहात की, एस.आय. घेणार आहात ?

**अजित पाटील :-**

वाहन चालक, सध्या एस.आय. आहेत.

**अनिल सावंत :-**

श्री. पाटील साहेब, मला एक सांगा की, आपल्याकडे सध्या एस.आय. चे काम करणारे किती आहेत?

**अजित पाटील :-**

आठ आहेत.

**अनिल सावंत :-**

दहा लाखाच्या पॉप्युलेशनला ते आठ सफीशिएन्ट आहेत का ?

**अजित पाटील :-**

पुरेसे आहेत.

**अनिल सावंत :-**

कारण आमचे श्री. पवार आणि श्री. खैरे यांचा तिकडे घाम निघतो. एवढा मोठा एरिया आहे. म्हणजे दहा लाखाच्या पॉप्युलेशनला तुमचे आठ एस.आय. आहेत. मला वाटते हे प्रमाण फार कमी आहे. मा. आयुक्त साहेब, आपल्या महापालिकेमध्ये काही एस.आय. आहेत ज्यांनी सॅनिटरी इन्स्पेक्टरचा कोर्स केलेला आहे आणि क्लार्कचे किंवा पिउनचे काम करत आहेत आणि ते एस.आय. चे काम करायला तयार असतील तर त्यांना तुम्ही त्याच स्केलमध्ये प्रमोट करुन एस.आय. चे काम करु द्या.

**मा. आयुक्त :-**

दोन भाग करु आणि जे एक्झीस्टींग आठ एस.आय. आहेत त्यांच्याकडे जर कामाचे अनइव्हन डिस्ट्रीब्युशन आहे असे तुमच्या सांगण्यावरुन दिसते. श्री. पाटील साहेब, श्री. कांबळे आणि श्री. शिंदे, सध्याचे जे आठ एस.आय. आहेत त्यांना तुम्ही जे कामाचे वाटप करुन दिले आहे ते जे अनइव्हन आहे. म्हणजे

इक्वल नसेल त्याचे रिऑर्गनायझेशन करुन एखाद्याला जास्त लोड दिला असेल तर तो थोडा, श्री. खैरे सारख्यांचा, कमी करा. आणि ज्याला कमी काम दिले आहे त्याला इक्वल द्या. दॅट इज वन, आणि जी दुसरी सुचना आहे की, जर अतिरिक्त एस.आय. घेता येतात का? ज्यांनी कोर्स केलेला आहे. ते ही बघा जेणेकरुनण....

**मिलन म्हात्रे :-**

भाईंदर वेस्टला पुर्वी दोन एस.आय. होते. आत्ता एक ठेवला. एकटा माणूस भाईंदर वेस्टला किती मरणार?

**जुबेर इनामदार :-**

श्री. अजित पाटील साहेब, मिरा रोडला पुर्वी श्री. पवार आणि श्री. खैरे होते.

**अनिल सावंत :-**

आत्ता एकच ठेवला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

भाईंदर वेस्टला पुर्वी दोन होते तसे दोन पाहिजेत.

**जुबेर इनामदार :-**

खरोखरच प्रशंसा केली पाहिजे. श्री. खैरे चांगला एस.आय. आहे. श्री. पवारही त्याच्या बरोबर चांगला एस.आय. आहे. आम्हाला त्याच्या विराध्ांत कधीही तक्रार नव्हती आणि ती आजही नाही.

**मा. आयुक्त :-**

दोन गोष्टी करा. हे म्हणतात त्याप्रमाणे श्री. खैरे चांगला असेल त्याला थोडे जास्त काम द्या. परंतु एकदम जास्त देवू नका. दुप्पट देवू नका आणि बाकी.....

**मिलन म्हात्रे :-**

भाईंदर वेस्टचे काय करता? भाईंदर वेस्टला आम्हाला दोन एस.आय. पाहिजेत.

**अनिल सावंत :-**

म्हणजे सहा एस.आय. फक्त भाईंदर ईस्ट साठी. मिरा रोडला एक आणि भाईंदर वेस्टला एक.

**मिलन म्हात्रे :-**

भाईदर वेस्टला सगळे आहे. म्हणजे त्याने सगळे बघायचे. तुमचा येणारा माल, औषध फवारणी, सगळे. त्याकरिता इकडे पहिले दोन माणसे होती ती तुम्ही कमी का केली? कुठल्या आधारावर कमी केली?

**मा. आयुक्त :-**

तुम्ही तिघेजण बसून त्याची खात्री करा.

**शानु गोहिल :-**

श्री. अजित पाटील साहेब, की तुम्हाला एस.आय. बद्दल एक पत्र दिले होते. त्याच्यावर काय कार्यवाही केली?

**अजित पाटील :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो. सन्मा. सदस्या. सौ. शानू गोहिल यांनी जे पत्र दिलेले आहे. श्री. उदावन यांच्याबद्दल तक्रारी आहेत त्या अनुषंगाने त्याचा ट्रान्सफर करण्याबद्दल प्रस्ताव मंजुर केलेला आहे. काही दिवसात त्याचा ट्रान्सफर करण्यात येईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

इकडे काम करत नाही, म्हणून दुस-या जागेवर ट्रान्सफर करणार का ? तुम्ही ट्रान्सफर करणार म्हणजे काय ? म्हणजे एखाद्याच्या दरवाज्यातून दुस-याच्या दरवाज्यात टाकणार का ?

**अजित पाटील :-**

श्री. उदावन संदर्भामध्ये प्रशासनाने सांगून सुध्दा बरीच कामे होत नव्हती. नगरसेवकांच्या तक्रारी होत्या. या संदर्भात मा. आयुक्त साहेबांना प्रस्ताव सादर केला आणि ट्रान्सफरचे आदेश काढतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ट्रान्सफर कुठे करणार?

**अजित पाटील :-**

त्याचे क्षेत्र बदलणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजे याचा अर्थ त्यांच्या वॉर्डमध्ये त्रास आहे. म्हणून तो यांच्या वॉर्डमध्ये टाकणार.

**अजित पाटील :-**

तसे नाही. त्यांच्याकडे चार गट होते. चार गटांमध्ये बरोबर काम होत नव्हते. कार्यक्षमता बरोबर नव्हती. त्याचे तीन गट काढले. त्याला एकाच गटाचे काम दिलेले आहे.

**प्रविण पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, याच्यामध्ये तुम्ही दिले आहे की, कर्मचा-यांना गणवेश, गमबुट, छत्र्या इत्यादी खरेदी करणे तर आपण ठेकेदारांना जे देतो. क्ष्याच्यामध्ये अकरा नंबरचा असा मुद्दा आहे की, तिथे ठेकेदारांना

कार्यादेश दिल्यानंतर एक महिन्याच्या आत प्रत्येक मजुराला ओळखपत्र, गणवेश, गमबुट, मास्क, हातमोजे इत्यादी विशेष वस्तू बंधनकारक आहेत. तर हे त्यांना कुठले द्यायचे? ठेकेदार देतो की, महानगरपालिका देते?

**अजित पाटील :-**

ही तरतुद केलेली आहे. महानगरपालिकेच्या परमनन्ट कर्मचा-यांकरिता द्यायचे.

**प्रविण पाटील :-**

मग त्या कंडीशनमध्ये काय झाले? ठेकेदार का देत नाही? तुमची जी ॲग्रीमेंट आहे, त्याच्यामध्ये एका महिन्याच्या आत ठेकेदाराने त्या कर्मचा-यांना ओळखपत्र, गमबुट वगैरे दिले पाहिजेत. मग ते देत का नाहीत? हे तर फार महत्वाचे आहे.

**अजित पाटील :-**

ॲग्रीमेंटनुसार कारवाई करुन सुध्दा.....

**प्रविण पाटील :-**

साहेब, ॲग्रीमेंटमध्ये तुम्ही त्याच्याकडून प्रत्येक महिन्याला एक हजार रुपये दंडपण वसुल करणार आहात. पण केला आहे का?

**अजित पाटील :-**

दंडाची वसुली नाही केली.

**अनिल सावंत :-**

असे करु नका. पहिलाच मिरा भाईंदरच्या कच-याला सोन्याचा भाव आलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा.आयुक्त साहेब, हा जो तीन नंबरचा आहे, पर्यावरण सद्य स्थिती अहवाल तयार करणे. ठाणे महानगरपालिकेला त्यांनी प्रत्येक नाके, रेल्वे स्टेशन, वगैरे ही जी काम महत्वाची, जसा आपला काशिमिरा नाका आहे. मिरा रोड, भाईंदर वेस्ट, ईस्ट या ठिकाणी तुम्ही ते इलेक्ट्रॉनिक बोर्ड, म्हणजे सध्या तुमच्या शहराचे पोल्युशन किती आहे काय आहे ? हवेचे वातावरण बरोबर आहे का ? हा इलेक्ट्रॉनिक बोर्डचा जो एक प्रकार आहे. जसा ठाण्याला आहे. किंवा आपली सिग्नल व्यवस्था आहे. तुम्हाला तिकडे लगेच कनेक्शन मिळेल. त्या ठिकाणी जर तुम्ही केले तर ते करायला तुम्हाला चांगले स्पॉन्सर पण मिळतील. त्याचा डिस्प्ले एखाद्या कंपनीला तुम्ही टेंडर काढा. त्याच्यानंतर खाली आपला जो डिस्प्ले आहे, तो ते करणार. त्याच्यावरती त्यांनी जी काही ॲडव्हर्टाईज करायची ती करायची. म्हणजे त्याला तुमचे पैसेही लागणार नाहीत आणि सगळ्यांना व्यवस्थित अद्यावत स्थिती कळेल. शहरात दहा पंधरा ठिकाणी ते करुन बघा. त्याबद्दल तुमचे काही आदेश असतील ते संबंधित विभागाला द्या.

**मा. आयुक्त :-**

श्री. पानपट्टे साहेब, ह्या इलेक्ट्रॉनिकची तपासणी करुन बघा.

**मिलन म्हात्रे :-**

स्पॉन्सरवर ठरवा. असे स्पॉन्सरर भरपूर आहेत.

**मा. आयुक्त :-**

इलेक्ट्रॉनिक्सची तपासणी करुन आपण तसा एक प्रस्ताव तयार करु.

**मिलन म्हात्रे :-**

बांधकाम विभाग करणार की कोण करणार ?

**मा. आयुक्त :-**

श्री. पानपट्टे

**मिलन म्हात्रे :-**

ते बांधकाम विभाग करणार का? नाहीतर ते नंतर बोलतील की, माझ्याकडे बांधकाम विभाग नाही. तुम्ही शहर अभियंत्यांना मार्क करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

गोषवा-याप्रमाणे ठराव मंजुर करावा अशी मी विनंती करतो.

**तुळशिदास म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ११७ :-**

पुर्नियोजन मंजुरी मिळणेबाबत. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १०५ :-**

आरोग्य विभागाच्या खालील लेखाशिर्षाच्या प्रस्तावीत वाढीच खर्चासाठी पुर्नविनियोजनास मंजूरी मिळणे कामी गोषवारा वाचन करण्यात आला. सन २००८-०९ या वर्षातील अंदाजपत्रकामध्ये आरोग्य सोयी व सफाई या मुख्य शिर्षातील खालील नमुद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकात तरतुद (अखर्चीत रक्कम) शिल्लक आहे व अंदाजपत्रका पेक्षा जादा प्रस्तावीत वाढीव खर्च करावा लागणार आहे.

| क्र | उपलब्ध शिल्लक | | प्रस्तावीत वाढीची रक्कम | |
|---|---|---|---|---|
| १ | किटक नाशके /दुर्गंधी नाशके खेरेदी | रु. ८,००,०००/- | एकात्मिक डास नियंत्रण करणे | (आरोग्य विभाग) रु. २३,००,०००/- |
| २ | कर्मचारी गणवेश, गमबुट, छत्र्या इत्यादी खरेदी करणे | रु. ५,००,०००/- | इंधन वाहन दुरुस्ती | (आरोग्य विभाग) रु. १०,००,०००/- |
| ३ | पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करणे | रु. ३,७९,७४४/- | जे.सी.बी. ठेका एस.आय व वाहनचालक घेणे | (आरोग्य विभाग) रु. ५,००,०००/- |
| ४ | ब) संरक्षण भिंत बांधणे | रु. ५,००,०००/- | | |
| | क) रस्ते बांधकाम | रु. १०,००,०००/- | जे.सी.बी/ डंपर दुरुस्ती | (आरोग्य विभाग) रु. ३,७९,७४४/- |
| ५ | सक्श्न मशिन/चलत शौचालय /व्हॅक्युम ॲम्पीयर खरेदी | रु. १०,००,०००/- | | |
| | **एकुण उपलब्ध शिल्लक** | **रु. ४१,७९,७४४/-** | **प्रस्तावित वाढीव खर्च** | **रु. ४१,७९,७४४/-** |

वरीलप्रमाणे उपलब्ध असलेली शिल्लक प्रस्तावीत वाढीव खर्च, करावयाच्या रक्कमेसाठी वर्ग करण्यास हि सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदक :- श्री. प्रकाश ठाकूर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११८, निविदांना मंजुरी मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, आत्ता जे परिपत्रक वाचता ते आत्ता माझ्या हातात आले. तुम्ही ३०/०१/२००९ ते ०३/०२/२००९ पर्यंत या बजेटवर चर्चा करण्यासाठी स्टँडींग कमिटीची मिटींग लावली आहे. आज २९ आहे. उद्यापासून लगेच मिटींग. मग आम्ही आमच्या संघटने बरोबर आणि इतरांबरोबर बजेटवर चर्चा कधी करणार.

**नगरसचिव :-**

आत्ता मा.सभापतींनी सुचना दिली. त्यामुळे.....

**अनिल सावंत :-**

सर्व सन्मा. सभासदांना, आमचे गटनेते आहेत त्यांना सर्वांना संधी द्या. दोन दिवस तरी द्या.

**मा. सभापती :-**

जे पुर्वीचे सभासद याच्यामध्ये असतील. त्यांना माहिती आहे. त्यांना माहितीनुसार या बजेटमध्ये काही फेरबदल जास्त केलेला नाही. ॲज इट इज गेल्या वर्षीचे बजेट होते त्याप्रमाणे ठेवलेले आहे आणि ज्या चार पाच विषयावर वाढीव बजेट झाले असेल किंवा झाले असेल त्याच्यावर चर्चा करायला दोन-तीन दिवस फार जास्तच झाले आहेत.

**अनिल सावंत :-**

दोन तीन दिवस कुठे? उद्यापासून होते आहे. तुम्ही उद्यापासून डिस्कशन करता.

**मा. सभापती :-**

आपण संपवण्यासाठी म्हणतो.

**जुबेर इनामदार :-**

आपण संपवू ना. मा. सभापती साहेब, एक तारखेपासून ठेवा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, उद्याच्या सभेला माझी तरी तयारी आहे.

**अनिल सावंत :-**

तुम्ही एकटेच आहात. तुम्ही सार्वभौम आहात. आम्हाला कोणाला तरी जबाब द्यायचा आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांनी मला होकार दिलेला. श्री. पाटील यांना विचारले, सौ. शानु गोहिल यांना विचारले. बाकीचे सर्व सभासद यायला तयार आहेत.

**अनिल सावंत :-**

आपण चार दिवसात घेवू. पण ती उद्यापासूनच लावू नका. आम्हाला दोन दिवस तरी द्या. आमच्या गटनेत्यांबरोबर चचा करायला.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब, एक तारखेपासून ठेवा.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, एक तारखेपासून घ्या. आपण तीन तारखेपर्यंत संपवून टाकू.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब दोन ते पाच. दोन तारखेपासून पाच तारखेपर्यंत संपवून टाकू आणि तुम्ही बोललात तर एका दिवसात संपवू.

**मिलन म्हात्रे :-**

माझी उद्यापासून तयारी आहे. दहा-दहा, बारा-बारा तास लागतात. उगाच काहीतरी पोरखेळासारखे बोलू नका.

**जुबेर इनामदार :-**

आमची सर्वांची अशी मागणी आहे की, दोन तारखेपासून घ्या.

**शानू गोहिल :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही सोमवारपासून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, आम्हाला फायनल करुन कधी द्यायचे आहे ?

**मा. सभापती :-**

तीनला.

**अनिल सावंत :-**

आपल्यावर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याला बंधन असते. प्रिंटींग वगैरे होवून द्यायला तुम्हाला प्रशासनाकडे आमचे बजेट किती तारखेपर्यंत देणे बंधनात्मक आहे. तारीख सांगा.

**नगरसचिव :-**

चोवीस तारेखला सर्वसाधारण मा. महासभा ठेवण्याच्या विचाराप्रमाणे त्याच्या दहा दिवस अगोदर तुमच्या चर्चेला किती दिवस लागतात. त्यानंतर चर्चा झाल्यानंतर प्रिंटींगचे दिवस. चौदा आणि मधल्या दिवसात प्रिंटींग.

**मिलन म्हात्रे :-**

किती ? तो आठवडा पकडायला लागेल ? तारीख सांगा.

**नगरसचिव :-**

साधारण सात ते आठ दिवस पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे किती दिवस झाले? चार तारखेला तुम्हाला रेडी पाहिजे. आत्ता तुम्ही ठरवा काय ठरवायचे ते.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११८, निविदांना मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**मदन सिंग :-**

प्रकरण क्र. ११८, गोषवा-याप्रमाणे सदर विषय मंजुर करण्यात यावा असा मी ठराव मांडतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, हा ठराव झाला. याच्यामध्ये आपल्याला नवीन पुरवठा करण्याकरीता तुमच्या गोडाउनला त्याच्यातील स्टॉक का आहे कारण दरवेळेला आम्ही मंजुरी देत जातो. स्टॉकचे काही दाखवतच नाहीत. परत मग स्क्रॅपचे काय झाले? तुमचे जे तुटलेल पाईप आहेत, अमुक आहे, तमुक आहे त्याचे स्टॉक रजिस्टर काहीच येत नाही. तुमची वस्तु गोडाउनला जमा होते ती स्क्रॅपमध्ये ऑक्शन झाली पाहिजे ना? श्री.नानेगांवकर आहेत ना? त्यांनी खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

स्क्रॅपचा जो काही डाटा आहे तो आपल्याला समितीसमोर ठेवता येईल.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, त्यांनी बजेट काढण्यासाठी जे अंदाजे दर दिलेले आहेत त्याच्यापेक्षा ८ टक्के दराने जास्त ?

**मा. आयुक्त :-**

खाली कंसात तुम्ही वाचा, अंदाजपत्रकीय दराने आहे. आपण अंदाजपत्रकीय दराच्या वर जात नाही.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, श्री इरकर बद्दल काय करणार आहात, जरा स्पष्टीकरण करा.

**मा. आयुक्त :-**

श्री इरकर यांचा पूर्ण शहराचा चार्ज काढून त्यांना अर्ध्या शहराचा चार्ज दिला ही एक कार्यवाही झाली. माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, ती ॲप्रीशिएट करावी. त्या उपर अर्ध्या शहरात पण समाधानकारक काम नसेल तर आपण त्यांचा सर्व चार्ज काढून दुसरीकडे ट्रान्सफर करु.

**जुबेर इनामदार :-**

मग तुम्ही निर्णय घ्या ना.

**मा. आयुक्त :-**

मी निर्णय घेतो.

**जुबेर इनामदार :-**

अर्ध्या शहराचा चार्ज आहे तरीसुध्दा तो काम करत नाही त्याला ॲप्रीशिएट कशाला करायचे? एवढे सन्मा. सदस्य बोलतात, मा. महासभा बोलते, चुकीचे बोलते का?

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्यावर काही दबाव वगैरे आहे का ? काय ते खरे सांगा एकदा फायनल करा.

**मा. आयुक्त :-**

मी करतो.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही हे जे उत्तर देता ते मी गेल्या महिन्यापासून ऐकतो.

**मा. आयुक्त :-**

आपण अगोदर असेच ठरवले होते की, श्री इरकर यांना अर्धा चार्ज देवून अर्धा चार्ज श्री.मेश्राम यांच्याकडे द्यायचा.

**मिलन म्हात्रे :-**

तो तुमचा लुकआउट आहे. तुम्ही अर्धा द्या, पूर्ण द्या आम्हाला घेणे देणे नाही. ही व्यक्ती प्रत्येक कामामध्ये हजर नसते. बारा वाजता ऑफीसला येणार. फोन बंद असतो. हे आमचे चार्ज आहेत म्हणून बदली करा बोलतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याच्यामध्ये माझी एक सुचना आहे त्यांना सांगा की, प्रत्येक गार्डनला हप्त्यातून दोन किंवा एक दिवस तरी....

**मिलन म्हात्रे :-**

आज चर्चा झाली ना. पाच मिनिटे भेट देणार. परत ये रे माझ्या मागल्या. मी तुम्हाला स्पष्ट सांगतो. माझ्या गार्डनमध्ये सहा महिन्यामध्ये लाखो रुपयांच्या चो-या झाल्या. कुठल्या अधिका-यांनी एफ.आय.आर. लॉंच केली नाही. स्वतःच्या घरचे काही चोरी होवू द्या. लगेच जावून उभे राहतील.

**अनिल सावंत :-**

साहेब, मिरा रोड शांती नगरला चार गार्डन आहेत. संध्याकाळच्या वेळेला वॉचमेन नसतो. तिकडे सगळे चरसी लोक बसतात. नागरिकांच्या कम्प्लेंट आल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्याकडे पण तेच आहे.

**शानु गोहिल :-**

साहेब, मी पण तक्रार केली आहे. श्री इरकर साहेबांना आत्ताच समोर बोलवा. दहा वाजेपर्यंत गार्डन उघडे असतात आणि चरसी, बेवडे लोक तिकडे बसतात.

**जुबेर इनामदार :-**

पुनम सागर नर्सरी विकसित केली. त्यांना विचारा तिकडे एकदा तरी गेले होते का? तिथे काय काम चालू आहे, किती काम झाले आहे, किती झाडे मेलेली आहेत, किती झाडे नवीन लावलेली आहेत. किती पिशव्या भरल्या आहेत. त्यांना कल्पना नसेल.

**प्रकरण क्र. ११८ :-**

निविदांना मंजुरी देणे. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. १०६ :-**

**<u>सि.आय. (मेकॅनिकल फिटींग व जॉईंट्स) पुरवठा करणे.</u>**

दि. ०२/१०/२००८ रोजीच्या दैनिक सामना या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार पुरवठादारांनी दर सादर केलेले आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे. (अंदाजित रक्कम रू.३६,२०,२२५/-)

| अ.क्र. | पुरवठादाराचे नाव | प्रस्तावित दर<br>(सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार) |
|---|---|---|
| १ | **मे. विंध्या ट्रेडर्स** | **८.०३ % ज्यादा दराने**<br>(वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दराने) |
| २ | मे. श्री गौरव ट्रेडर्स | १५.४७ % ज्यादा दराने |
| ३ | मे. केशरी ॲन्ड कंपनी | १६.१७ % ज्यादा दराने |

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता **मे. श्री विंध्या ट्रेडर्स** यांचे दर सर्वात कमी असून वाजवी व संयुक्तिक आहेत. सबब मे. श्री विंध्या ट्रेडर्स यांची लघुत्तम दराची निविदा मंजूर करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. मदन उदितनारायण सिंह          अनुमोदक :- श्री. प्रकाश ठाकूर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११९, मा. आयुक्त यांनी शिफरस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. महानगरपालिका सन २००९ ची दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करणे.

**प्रकरण क्र. ११९ :**

मा. आयुक्त यांनी शिफरस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे.

महानगरपालिका सन २००९ ची दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करणे.

**ठराव क्र. १०७ :-**

महानगरपालिकेने दि. ७/११/०८ रोजी "दै. सकाळ" व "दै. लोकमत" या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार महानगरपालिकेची सन २००९ ची दैनंदिनी/दिनदर्शिका छपाई करण्याकामी खालील ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केलेल्या आहेत.

| अ. क्र. | तपशिल | मे. चंदन ग्राफिक्स | मे. श्वेता पेपर प्रिंट | मे. सॉफ्ट टच | मे.अस्मिता आर्ट प्रिंटर | मे.निलिमा इंटरप्राईजेस | मे.साई श्रध्दा क्रियेशन | मे.रिलायबल पॅकेजिंग इन्डस्ट्रीज् |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दैनंदिनी (महानगरपालिकेने पुरविलेल्या नमुन्याप्रमाणे) | **रु. २२५/- प्र. नग** | रु. २८०/- प्र. नग | रु. २६०/- प्र. नग | रु. २६५/- प्र. नग | रु. २६८/- प्र. नग | रु. ३४५/- प्र. नग | रु. ३५२/- प्र. नग |
| २ | दिनदर्शिका (महानगरपालिकेने पुरविलेल्या नमुन्याप्रमाणे) | रु. १७५/- प्र. नग | **रु. १६०/- प्र. नग** | रु. २०४/- प्र. नग | रु. १८०/- प्र. नग | रु. २०८/- प्र. नग | रु. २६७/- प्र. नग | रु. २७५/- प्र. नग |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ मधील मे. चंदन ग्राफिक्स व अ.क्र. २ मधील मे. श्वेता पेपर प्रिंट यांनी सादर केलेल्या निविदेतील सर्वात कमी दराची निविदा मा.आयुक्त सो.यांच्या मान्यतेने स्विकारण्यात आलेली असून सदरकामी येणार खर्च अ) सामान्य प्रशासन स्टेशनरी व छपाई या लेखाशिर्षा अंतर्गत रु. ५०.०० (लाखाची) उपलब्ध तरतुदीतुन अदा करावयाचा आहे. दैनंदिनी/दिनदर्शिका प्रत्येकी १५०० नग छपाई कामास रु. ५,७७,५००/- इतका खर्च होणार असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम खंड (ड) अन्वये मा. स्थायी समिती सभेपुढे अवलोकनार्थ शिफारस करण्यांत आला.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, बजेटचे काय झाले ?

**अनिल सावंत :-**

डेट काय फिक्स केली ?

**मा. सभापती :-**

एकतीस, दोन आणि तीनला फायनल.

**नगरसचिव :-**

तीन तारखेला फायनल बजेट असेल.

**अनिल सावंत :-**

मग दुसरी मिटींग कधी लावणार ?

**नगरसचिव :-**

तीन तारखेला सहलीची मिटींग लावतो.

**अनिल सावंत :-**

मग तीन तारखेला दोन मिटींग असतील ?

**नगरसचिव :-**

होय दोन मिटींग.

**जुबेर इनामदार :-**

एक शोक प्रस्ताव आहे. भारत देशाचे माजी राष्ट्रपती श्री. रामस्वामी व्यंकटरामन यांचे दि. २७/१/२००९ रोजी दुपारी २.३० वाजता निधन झाले. ते ९८ वर्षाचे होते. त्या राष्ट्रपुरुषाला माझी श्रध्दांजली वाहतो. शोकप्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मांडत आहे.

**नगरसचिव :-**

सर्वांनी दोन मिनिटे उभे राहून मृतात्म्याला श्रध्दांजली वाहायची आहे.

**शोकप्रस्ताव क्र. १०८ :-**

भारत देशाचे माजी राष्ट्रपती श्री. रामस्वामी व्यंकटरामन यांचे दि. २७/१/२००९ रोजी दुपारी २.३० वाजता निधन झाले. ते ९८ वर्षाचे होते. या राष्ट्रपुरुषाला माझी श्रध्दांजली वाहतो. शोकप्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मांडत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्री. अनिल सावंत**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. १.०० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**